सुवर्णमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

स्थापना : १९६४

५०

ब्रह्मतेजो बलंबलम्

वर्ष ८ वे : अंक ३

जून २०२२

# मासिक नवस्नेह

स्वागतमूल्य ₹. 30/-



प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ,
मंगळवार पेठ, कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

।। श्री परशुराम प्रसन्न ।।

# कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर

**428, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर-416 012 फोन नं. 0231-2546225, 2991673, 7620546225**


आता कोल्हापूर चित्पावन संघाच्या नवीन वेबसाईटवर घरबसल्या सर्व ब्राह्मण पोटशाखेतील विवाहेच्छू तरुण तरुणींसाठी हजारो स्थळे पाहून आपल्या अनुरूप जोडीदाराची निवड करता येणार ! सर्व ब्राह्मण वधुवरांसाठी ही मोठी सुवर्णसंधीच म्हणावी लागेल!

- देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, कण्व, सारस्वत, देवरुखे, दैवज्ञ इ. सर्व ब्राह्मण पोटशाखांतील वधुवरांसहित मराठी, गुजराथी, कानडी व परप्रांतीय फक्त ब्राह्मण वधुवरांची घरबसल्या केव्हाही, कधीही आणि कितीही स्थळे पहाण्याची सोय !
- मोबाईलवर अधिकृत ॲपद्वारा वेबसाईट पाहण्याची सोय !
- अत्यंत गोपनीय व सुरक्षित वेबसाईट, सहज सोप्या पद्धतीने फॉर्म भरण्याची सुविधा !
- केवळ स्थानिकच नव्हे, तर संपूर्ण देशातील आणि जगभरातील ब्राह्मण वधुवरांची नोंदणीकृत स्थळांची माहिती उपलब्ध !
- आकर्षक तीन सवलत योजनेत विवाहेच्छूंसाठी ही पॅकेज उपलब्ध आहेत.

१) **श्री परशुराम पॅकेज :- स्वागत शुल्क रु. २,०००/- (एक वर्षासाठी)**

या पॅकेजमध्ये तुम्हाला एक वर्ष ऑफलाईन व एक वर्ष इंटरनेट नोंदणी मिळेल. यामध्ये वर्षभरात नोंदणी होणाऱ्या सर्व स्थळांची माहिती व संपर्क क्रमांक मिळतील. तसेच पसंतीच्या स्थळांना एस.एम.एस. पाठवण्याची व 'चॅट' ची सुविधा मिळेल. आपले १० फोटो अपलोट करण्याची सुविधा शिवाय संस्थेच्या 'नवस्नेह' मासिकांत आपल्या स्थळाची माहिती एकदा प्रसिद्ध केली जाईल. याचबरोबर पंचरत्न वधूवर सूचक केंद्राकडून pancharatnavivah.co.in या वेबसाईटमधील १०० स्थळे सहा महिने मुदतीत मोफत पहायला मिळतील. (अधिक माहितीसाठी संपर्क : 9881291863)

२) **श्री योगेश्वरी पॅकेज :- स्वागत शुल्क रु. १,५००/- (सहा महिन्यांसाठी)**

या पॅकेजमध्ये तुम्हाला सहा महिने इंटरनेट नोंदणी मिळेल. त्याचबरोबर या पॅकेजमध्ये तुम्हाला १२५ स्थळांची माहिती व संपर्क क्रमांक मिळतील. पसंतीच्या स्थळांना एस.एम.एस. पाठवण्याची व 'चॅट'ची सुविधाही तुम्हाला मिळेल. आपले १० फोटो अपलोड करण्याची सुविधाही यामध्ये आहे.

३) **श्री महालक्ष्मी पॅकेज :- स्वागत शुल्क रु. १,०००/- (तीन महिन्यांसाठी)**

यामध्ये नोंदणी करणाऱ्यांना तीन महिने इंटरनेट नोंदणी उपलब्ध असेल. ५० स्थळांचे संपर्क क्रमांक व माहिती मिळू शकेल. पसंतीच्या स्थळांना एस.एम.एस. व 'चॅटींग' सुविधा तसेच आपले किमान १० फोटो अपलोड करता येण्याची सुविधाही या पॅकेजमध्ये देण्यात आली आहे.

उपवर ब्राह्मण तरुण तरुणींनी आजच नोंदणी करून या सवलतीच्या पॅकेजचा लाभ घ्यावा. आमच्या माध्यमातून आपला विवाह लौकरच संपन्न व्हावा या शुभेच्छा !

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष ८ वे : अंक ३ : जून २०२२**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** श्री. पुष्कर ताम्हनकर 9890737221
  सौ. पल्लवी देशमुख 9420455984


### अनुक्रम


१) **संपादकीय /४**
२) **लौकिक दंतकथांचे वास्तव /५**
- सुधीर दाजी जोशी
३) **हम आपके है कौन/८**
- प्रकाश गणेश गानू
४) **जय गंगे । जय भागिरथी /१०**
- सौ. किरण फडणीस
५) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी' / १२**
- सौ. मंजुश्री गोखले
६) **ज्ञानसूर्याची सावली /१४**
- सौ. मंजुश्री गोखले
७) **लहान मुले नैसर्गिक पद्धतीने भाषा शिकू शकतात / १८**
- इंद्राणी केळकर
८) **छत्रपती शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ /२१**
- गुरुप्रसाद कानिटकर
९) **ब्राह्मण समाज अभिमानास्पद व्यक्ती गौरव /२३**
१०) **वधूवर माहिती यादी /२५**



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स,
  १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
  मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे
  विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस,
  कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०





सुवर्णमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ


मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५

- **संचालक मंडळ**

**श्री. सदानंद दिनकर मराठे** (अध्यक्ष)
0231-2541823
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष)
9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह)
7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह)
9881077513
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार)
8149480034

- **संचालक**

सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. विठ्ठल गणेश नरवणे 9765971524
श्री. मकरंद विष्णू करंदीकर 9421113005
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडीलकर 9422046611



**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६**
**(साप्ताहिक सुट्टी नाही)**


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. ९ वर दिली आहे.**

# संपादकीय...



नमस्कार मंडळी,

हा अंक हातात पडेपर्यंत पाऊस सुरूही झाला असेल. मस्त पावसाळी हवा, रिमझिम पडणारा पाऊस, मातीचा सुगंध, गरमागरम कांदा भजी, सोबत तळलेली हिरवी मिरची आणि हातात नवस्नेहचा अंक, आहाहा ! यापरते सुख दुसरे काय? खरं ना? आता हे सुख प्रत्यक्षात येणार! कांदा भजीवरनं आठवण झाली. रस्त्यावर करत असलेल्या कांदाभजीच्या खमंग वासानं अवघा आसमंत दरवळतो, पण घरी केली तर फक्त शेजाऱ्यांना वास येतो, आपल्या घरात नाही. महिमा ज्याचा त्याचा, नाही का? असो. हे भजीपुराण संपत नाही. जेवढं जास्त चालेल, तेवढं जास्त खमंग होत जातं, आपल्या 'नवस्नेह' सारखं!

मित्रांनो, एक मात्र खरं की, राजकीय आणि सामाजिक वातावरण तापत असताना या पावसानं हवा मात्र थंड केली. नवस्नेहमधून आमचाही हाच प्रयत्न असतो. बाहेरचं वातावरण कितीही तापू दे किंवा दूषित होऊ दे, आपला नवस्नेह स्वच्छ, शुद्ध, निर्मळ आणि शीतलच राहाणार. कारण 'जे जे उत्तम, उदात्त, उन्नत, महन्मधुर ते ते...' आपल्या नवस्नेहमध्ये येणार हेच तर आमचं तत्व आहे. तेव्हा मंडळी यातलं तुमच्याकडं काही असेल तर जरूर नवस्नेहसाठी आमच्याकडे पाठवा, त्याचं स्वागतच आहे.

आता जून महिना म्हणजे शाळा सुरू होणार आणि यंदा शाळा प्रत्यक्ष सुरू होणार. ऑनलाईनची बाब संपली. पालकांनी, शिक्षकांनी सुटकेचा निःश्वास टाकला असेल. कारण एकंदर सर्व्हे असं सांगतो की, ऑनलाईन शाळांमुळं सगळच नुकसान झालं. विद्यार्थ्यांना मोबाईलची नको तेवढी सवय लागली. लिखाणाची सवय मोडली. एका जागी बराच वेळ बसण्याची सवय मोडली. एकाग्रचित्त होण्याची सवय मोडली. आणि या तीन सवयी म्हणजेच तर शिक्षणाचा पाया. तोच डळमळीत झाला. त्यांचं वेळच्या वेळी जेवण होईना, जंक फूड खायची सवय लागली, शिक्षणाला दर्जा राहिला नाही. शिवाय पालकांचा त्रास वाढला ते वेगळंच. पण आता हे चित्र थोडसं बदलेल. शाळा प्रत्यक्ष सुरू होतील. विद्यार्थी पुन्हा शिकायला लागतील नी मोबाईल ऐवजी मित्रांच्यात रमतील. छान वाटेल.

मागच्या महिन्याच्या संपादकीय मध्ये सांगितल्या-प्रमाणे या अंकापासून 'राजा शिवछत्रपतींचे अष्टप्रधान मंडळ' ही लेखमाला सुरू करतो आहोत. एकंदरीत सामाजिक परिस्थिती पाहता छत्रपतींच्या अष्टप्रधानां-पैकी सात जण ब्राह्मण होते हाही इतिहास कदाचित बदलला जाईल. आपल्याला आणि किमान पुढच्या पिढीला तरी हे सत्य माहित असावं, यासाठीच हा प्रपंच! आणि सर्व पालकांना (जे नवस्नेहचे वाचक आहेत) नम्र विनंती की, किमान हे लेख तरी आपल्या मुलांना वाचायला सांगा. कारण ऐतिहासिक सत्यांचा आधार घेऊन हे लेख लिहिले आहेत. सत्यतेच्या कसोटीवर खरे आहेत. याशिवाय अंकात आपली नेहमीची सदरे आहेतच.

या अंकात ब्राह्मण समाज अभिमानास्पद व्यक्ती गौरव हे नवीन सदर आहे. त्यात सातत्य ठेवण्याचा आमचा मानस आहे. अर्थात तुमच्या पाठबळावर. मित्रांनो, नवस्नेहच्या वाचकांची यादी, त्यांचे पत्ते, वर्गणी अपडेट करायचं काम चालू आहे. तुमचं सहकार्य आवश्यक. नवस्नेह हवा असेल आणि वर्गणी भरली असेल, पत्ता बदलला असेल, बदलायचा असेल तर तसं फोनवर कळवा. कळवाल ना? नवस्नेह तुमच्यापर्यंत पोहोचण्यासाठी तुमचं हे सहकार्य जरूरी आहे. पावसाळा एन्जॉय करूया, नवस्नेहच वाचूया, स्वतःची प्रकृती जपूया. थांबते.

**किसीने कहा कठीण है जिंदगी,**
**किसीने कहा मुश्किल है जिंदगी ।**
**स्नेह के बीज बोकर तो देखो,**
**खुशियों से लहलहाती फसल है जिंदगी ।**

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,**
मोबा. ८८०५३५५२००

# लौकिक दंतकथांचे वास्तव

**(लेखांक तिसरा)**

माणूस कायमच सुखासाठी धडपडत आला आहे. आयुष्याचा प्रवास करताना सर्व सुखे प्राप्त व्हावीत असे त्याला कायमच वाटते. परंतु या सुखाचा शोध घेताना वाटेत अनेक अडचणी येतात. सुखासोबतच दु:खेही येतात. गुलाबाच्या फुलासोबत काटे असतात, त्याचप्रमाणे बऱ्याच गोष्टी करायच्या असतात. सर्वच गोष्टींची प्राप्ती होत नाही. अतृप्तता येतेच. ज्या गोष्टी, ज्या कृतींनी जिवंतपणी आपल्याला सुख मिळत नाही. त्या कृती आपण मरून अदृश्य झाल्यावर कदाचित प्राप्त होतील अशी समजूत मानव करून घेत असतो. ह्याच समजुतीपासून अनेक प्रकारचे विधी, तत्सदृश्य दुसऱ्या अनेक कल्पना अद्‌भूत होऊ लागल्या. मानव अगदी प्राथमिक प्रगतीच्या अवस्थेत असल्यापासूनच त्याची एक समजूत अगदी दृढ होती, ती म्हणजे मनुष्य मेल्यावर सर्वस्वी नष्ट होत नाही. त्याचे व्यक्तित्व 'कोणत्या' ना कोणत्या रूपाने शिल्लक राहतेच. या प्रचलित समजुतीमुळेच 'धर्म' या कल्पनेचे बीज रोवले गेले. धर्मासोबत अनेक रूढी, परंपरा निर्माण झाल्या. शुभ-अशुभ, भेदाभेद, श्रद्धा-अंधश्रद्धा निर्माण झाल्या. पिढी दर पिढी त्या वाढत गेल्या. पूर्वसुरींनी सांगितलेल्या गोष्टी खोट्या कशा बरे असतील? या समजुतीमुळे त्या दृढ झाल्या. पोसल्या गेल्या, वाढल्याही.

सध्याच्या विज्ञानाच्या काळामध्येही मनुष्य या प्रकारच्या अनेक समजुती बाळगून असतो. त्यातील बऱ्याच गोष्टींचं, कृतींचं अंधानुकरण तो करत असतो. प्रत्येक कृतीमागे कारणमीमांसा करत नाही. विचार न करता त्या कृती करत राहतो. हल्लीच्या घाईच्या जगामध्येही अशा प्रकारच्या विधींसाठी तो वेगळा वेळ काढतो. परंतु आपण किती वर्षे या गैरसमजुती बाळगणार आहोत? प्रत्येक रूढीचा, परंपरेचा, कृतीचा, विधीचा विवेकाने विचार करायला हवा. ती काळाची गरज आहे. या दंतकथांमुळे आपले फारसे नुकसान होत नसेलही, 'असू देत, त्याला काय होतय?' वगैरे विचार मनात आणून आपण या गोष्टी पुढे नेत आहोत. परंतु या सर्व गोष्टी कुठेतरी थांबायला हव्यात. म्हणून या लेखनप्रपंच.

नरमेध - प्राचीन काळी कित्येक प्रसंगांवेळी नरमेध-म्हणजेच मनुष्याचा बळी दिला जात असे. राजाचा राज्याभिषेक होताना नरबळी दिला जात असे. ही प्रथा कालांतराने थोडी बदलली. नरमेधाऐवजी एका हलक्या जातीच्या मनुष्याचे अंगठ्याजवळील बोट कापून त्या रक्ताचा टिळा राजाला लावू लागले. तसेच प्राचीन काळी यज्ञ करीत असतानाही नरबळी दिला जात असे. अर्थात तेव्हा मानवाचा विकास अगदी प्राथमिक अवस्थेत होता. पुढे त्याला मनुष्याच्या जीवाची किंमत समजू लागली. त्यानंतर रेड्याचा बळी देऊ लागले. त्यानंतर बकरे कापू लागले. बकऱ्याचा बळी तर आजही महाराष्ट्रात कित्येक ठिकाणी दिला जातो. नंतर बकऱ्याऐवजी कोंबडे कापू लागले. एखाद्या महत्त्वाच्या प्रसंगी रक्त सांडले जाणे हे शुभ समजतात. रक्ताची शपथ घेणे, रक्ताने पत्र लिहिणे, रक्ताने स्वाक्षरी करणे या गोष्टी म्हणजे आपली टोकाची निष्ठा दर्शवणे असे मनुष्यास वाटते. पूर्वी किल्ला बांधताना, विहिर खोदताना मनुष्याचा बळी देत असत. असे केल्याने किल्ला अजिंक्य होतो, विहिरीस हमखास पाणी लागते अशी समजूत होती. त्यातही कालांतराने बदल झाला व अंगठ्याजवळील बोटाचे रक्त शिंपडू लागले. यातही नंतर बदल होत गेला. सध्या आपण एखाद्या शुभकार्यावेळी नारळ वाढवितो. ही नारळ वाढविण्याची प्रथा नरबळीचाच प्रगत प्रकार आहे. नारळाचा आकार, त्याला शेंडी असणे, डोळे असणे हे सर्व मनुष्याच्या डोक्याप्रमाणे असलेने नारळ वाढविला जातो. अभ्यासाने, वाचनाने हा प्रकार लक्षात आल्यानंतर हल्ली बऱ्याच ठिकाणी नारळ वाढवित नाहीत. त्याऐवजी फक्त नारळ समोर ठेवून त्याची पूजा केली जाते. हे अर्थातच प्रगतीचे

चांगले लक्षण आहे. काही प्रसंगी नारळाऐवजी कोहाळा फोडला जातो. आपल्याकडे नवरात्रात कोहाळा फोडतात. तसेच नव्या घरात प्रवेश केल्यानंतर कोहाळा एका कापडात बांधून दारात लटकवतात. ही कृती नरमेधाचीची पुढची प्रगत पायरी आहे. कधी कधी उडदाच्या पिठाची बाहुली करून ती मनुष्याऐवजी बळी देतात. हा बळी अश्विन शुद्ध अष्टमीस अथवा दशमीस देतात.

केरसुणी - आपल्याकडे नैऋत्य दिशेला अशुभ मनातात. परंतु केरळमध्ये या दिशेला सभास्थान असते. नैऋत्य दिशेची देवता म्हणजे निर्ऋती, म्हणजेच अलक्ष्मी. पद्मपुराणात या जेष्ठा अलक्ष्मीचे नकारात्मक चित्रण आहे. या अलक्ष्मीचा विष्णूकडून स्वीकार झाला नाही. तिचा विवाह उद्दालक ऋषींसोबत लावून मगच विष्णूने तिला स्वीकारले. या ऋषीच्या आश्रमातील धुरामुळे त्याच्या सांगण्यावरून ती पिंपळाच्या झाडाखाली थांबली, परंतु तो न्यायला आलाच नाही. मग विष्णूने तिला वर दिला. शनिवारी पिंपळाखाली लक्ष्मीची पूजा करतात. मार्कंडेय पुराणात हिला यमाची पत्नी म्हटले आहे. या निर्ऋतीचा दूत कावळा. पिंडाला कावळा शिवण्याची, आत्म्याला मुक्ती मिळण्याची प्रथा यावरूनच निर्माण झाली.

ही लक्ष्मी खरारूढ असून हिचे आयुध 'मार्जनी' म्हणजे 'केरसुणी' आहे असे मानतात. मार्जनी म्हणजेच मार्जन करणारी. वाईट गोष्टी घालवणारी. केर घालवणारी ती केरसुणी. या केरसुणीला अपवित्रही मनातात व पवित्रही मानतात. दिवाळीच्या लक्ष्मीपूजनाच्या दिवशी केरसुणीची पूजा करण्याची प्रथा आहे. कचरा साफ करणारी म्हणून ती वाईट, तर याच कारणामुळे ती शुभ मानली जाते. केरसुणी उभी ठेवू नये. तसेच ती पायांनी तुडवू नये असे मानतात. मूल जन्माला येताच जर रडले नाही तर केरसुणीची पाने विस्तवात टाकून त्या धुरावर मुलाला धरतात. असे केल्याने मूल रडू लागते असा समज आहे. कित्येक ठिकाणी मुलाला खोकला झाला असेल तर केससुणीने त्याला वारा घालतात. असे केल्याने खोकला जातो असे मानतात. काही जातीत लग्नामध्ये केरसुणीची पूजा करतात. धरित्रीदेवीस झाडण्याच्या, स्वच्छ करण्याच्या कामी केरसुणी येत असल्याने ती पूजनीय झाली. एखाद्याने सकाळी उठल्यावर लगेच केरसुणी पाहिली तर त्याला तो दिवस अशुभ जातो असे मानतात. घरात केरसुणी उभी ठेवली तर नवरा-बायकोची सतत भांडणे होतात अशी समजूत आहे. एखाद्या मनुष्याने दुसऱ्याला केरसुणीने झोडपले तर त्याच्या काखेत गाठ होते अशी समजूत आहे. या सर्व माहितीवरून एक लक्षात येते की एखाद्या वस्तूला, कृतीला मनुष्य शुभ आणि अशुभ असे दोन्ही प्रकारे मानत असतो. सध्याच्या जगात केरसुणीऐवजी स्वच्छता करण्याच्या अनेक वस्तू आल्या आहेत. त्याचे शुभाशुभ कसे मानायचे? आपल्याकडे पूर्वी आणि काही प्रमाणात आताही असे मानतात की तिन्हीसांजेला केर काढू नयेत. असे केल्याने घरातील लक्ष्मी जाते. तिन्हीसांजेला आपण देवाजवळ दिवा लावतो, परवचा म्हणतो. लक्ष्मीला येण्याचे आवाहन करतो. म्हणून कदाचित असे मानत असावे. पण यामागचे शास्त्रीय कारण मला असे वाटते की, पूर्वी विजेचे दिवे नव्हते. तिन्हीसांजेला अंधार पडल्यानंतर जर साफसफाई केली, तर केर काढताना आपल्या नकळत एखादी सोन्या-चांदीची मौल्यवान लहान वस्तू कचऱ्यासोबत बाहेर टाकली जात असेल. हरवत असेल. अशा घटना अनेकदा घडल्यानंतर तिन्हीसांजेला केर काढू नये अशी प्रथा पडली असावी.

नवस - आपल्याकडे अनेक देवदेवतांना अनेक प्रकारचे नवस बोलण्याची प्रथा आहे. हा एक प्रकारचा देवासोबत केलेला करारच आहे. 'तू असे केलेस, तर मी असे करीन', 'तू मला हे दे, मी तुला हे देईन' अशा अटींवर नवस बोलतात.

अनेक कारणांसाठी लोकं नवस बोलत असतात. त्यात विशेष करून मुलगा व्हावा, प्रकृती सुधारावी, संपत्ती प्राप्त व्हावी, एखादी परीक्षा पास व्हावी, स्वत:चे घर व्हावे, विहिरीला पाणी लागावे, लग्न ठरवे, कोर्टातली केसचा निकाल आमच्या बाजूने लागावा, एखाद्या कार्यात यशप्राप्ती व्हावी, हरवलेली

वस्तू मिळावी, परागंदा झालेली व्यक्ती पुन्हा घरी यावी, अशी कारणे असतात. काही जणं तर व्यसन लागल्याप्रमाणे किरकोळ कारणांसाठीही नवस बोलतात. अर्थात या सर्व अंधश्रद्धा आहेत हे वेगळं सांगायला नको. असे केल्याने जर चांगल्या गोष्टी घडत असतील तर मनुष्याच्या कर्माला, कर्तुत्वाला काहीच अर्थ उरणार नाही. यात गंमत अशी आहे की नवस केल्यावर जर इच्छित वस्तूचा लाभ झाला, योजलेले कार्य पूर्ण झाले तर देव नवसाला पावला असे म्हणतात. परंतु जर विपरित घडले तर मात्र देवाला नावे न ठेवता दैवाला दोष दिला जातो. मागच्या जन्माच्या पापकर्माचे फळ आहे असे मानले जाते. सध्याच्या काळात सार्वजनिक गणेशोत्सवात आपल्या गणपतीकडे गर्दी खेचण्यासाठी कार्यकर्ते 'नवसाला पावणारा गणपती' अशी जाहिरात करताना दिसतात. हा तर शुद्ध वेडेपणा आहे. फसवणूक आहे. असो.

या नवसामध्ये देवाकडून अपेक्षा असतात, त्याचप्रमाणे मी काय करीन याची यादीही मोठी आहे. मनातील हेतू, इच्छा पूर्ण झाल्यास मी महारुद्र, लघुरुद्र करेन, सत्यनारायणाची पूजा करेन, ब्राह्मण भोजन घालेन, देवळाला तोरण बांधेन, पायऱ्या बांधेन, देवळात एखादी वस्तू अर्पण करेन, गरीबांना वस्त्रदान करेन, विहिर खणेन, मुलाची तुला करेन अशा प्रकारचे नवस बोलतात. काही व्यक्ती अमूक काळापर्यंत मौन बाळगेन, उपास करेन म्हणतात. काही स्त्रिया पिंपळाला, औदुंबराला प्रदक्षिणा घालण्याचा नवस बोलतात. काही जणांना आर्थिक परिस्थितीमुळे काही करता येणे शक्य नसते. त्या व्यक्ती 'अमुक घडले तर तुझ्या दर्शनाला येईन, तुझी ओटी भरेन, पूजा बांधेन, अभिषेक करेन' या प्रकारचे जमेल तसे नवस बोलतात. अशा प्रकारचे नवस बोलण्याऐवजी प्रत्येकाने आपल्या मनगटावर विश्वास ठेऊन कार्य करीत रहावे.

**– सुधीर दाजी जोशी,**

मोबा. ९८२२२९८७२६

## चिऊ ताई

कित्ती गं गोड तू अगं चिऊ ताई,
कसली गं असते सदा तुला घाई?

सकाळ होताच माझ्या अंगणात येतेस,
दाणे टिपून टिपून भुर्रर्र उडून जातेस!

घरटं तू बांधतेस कौलांच्या झरोक्यात,
इवली पिल्लं चिवचिवतात छोट्याशा घरट्यात!

पिल्लं मोठी झाली की घेऊन ये,
डोळे भरून त्यांना एकदा पाहू दे!

मोठी झाली की जातील दूर उडून,
डोळे आपले भरतील आठवण येऊन!

खूप खूप मोठ्ठं त्यांना होऊ दे,
चिवचिवाट दुनिया सारी ऐकू दे!

अंगणातल्या झोक्यावर बसू तू अन् मी,
ठेवू नवीन चिमण्यांना चारा न् पाणी!

पुन्हा नव्या चिऊताई रोज येतील,
चिव चिव चिमणेबोल गाणी गातील...!

**– मंदार पानवलकर.**

**परशुराम पतसंस्था कार्यालयीन वेळ**
**सकाळी १०.०० ते सायं. ५.००**
**देवघेवीची वेळ**
**सकाळी १० ते ४.३० पर्यंत**

'नवस्नेह' च्या माध्यमातून आपल्या पाल्याचे विवाह जुळल्यास पालकांनी कृपया याची माहिती कोल्हापूर चित्पावन संघास कळवावी, ही नम्र विनंती.

सर्व चित्पावन संघ व संस्थांची शिखर संस्था **अखिल चित्पावन ब्राह्मण सेवा संस्था**
वरदान सोसायटी, न. चिं. केळकर मार्ग, रामनगर, डोंबिवली (पू.)४२१२०१

# हम आपके हैं कौन

हम आपके है कौन हा सिनेमा ५ ऑगस्ट १९९४ रोजी रिलीज झाला. 'राजश्री प्रॉडक्शन' च्या बॅनरखाली तो रिलीज झाला. सिनेमा तुफान चालला. या सिनेमाचे लेखन व दिग्दर्शन सूरज बडजात्या यांनी केले.

या सिनेमाचे वैशिष्ट्य म्हणजे हा सिनेमा पूर्णपणे कौटुंबिक आहे व विवाह-समारंभाच्या प्रसंगावर आधारित आहे. या सिनेमात हाणामारी, दरोडा, खून, घाणेरडे संवाद, अश्लील दृश्य असलं काही नाही. तरीही या सिनेमाला प्रेक्षकांनी अक्षरश: डोक्यावर घेतले. अशा प्रकारचा निव्वळ कौटुंबिक सिनेमा तोपर्यंत आला नव्हता. कारण असा सिनेमा चालेल की नाही याची निर्माता व दिग्दर्शकांना शंका होती.

माधुरी दीक्षित, सलमान खान, रेणुका शहाणे, अनुपम खेर, रिमा लागू, अलोकनाथ, बिंदू, लक्ष्मीकांत बेर्डे असे कलाकार या सिनेमात होते. पण माझ्या मते माधुरी दीक्षितमुळे हा सिनेमा चालला. तिचं सौंदर्य, दिलखुलास व नखरेल हास्य, नृत्य, लाजवाब अभिनय, बोलके डोळे या सर्वांमुळे तिने या सिनेमाला एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले. अर्थात बाकीच्या कलाकारांचा त्यात वाटा होताच.

माधुरीचा जन्म १५ मे १९६७ रोजी मुंबई येथे झाला. तिचं ओजाळ कोकणात आहे असं म्हणतात. त्याचा मला खूपच अभिमान वाटतो. कारण मी पण कोकणातलाच आहे ना. मध्यंतरी मी रत्नागिरीला एका नातेवाईकाकडे गेलो होतो. बोलता बोलता त्याने मला त्याच्या कपाटातून एक जुना ग्रुप फोटो दाखवला. त्यातल्या एका लहान मुलीच्या फोटोवर बोट ठेवून तो म्हणाला, 'ही लहाणपणीची माधुरी दीक्षित.' मी आपला त्या फोटोकडे बघतच राहिलो.

'तेजाब' या सिनेमामुळे ती प्रसिद्धीस आली. 'हम आपके है कौन' या सिनेमामुळे तर ती सबंध चित्रपटसृष्टीत चमकायला लागली.

त्यावेळी हिरॉईनपेक्षा हिरोला जास्त पैसे मिळत असत. पण या सिनेमातील रोलसाठी माधुरीने २ कोटी ७५ लाख एवढे पैसे घेतले व सलमान खानला मिळालेल्या पैशांपेक्षा ते जास्त होते.

हम आपके है कौन या सिनेमाचे शूटींग उटी येथे झाले आहे. त्या सिनेमाची स्टोरी लिहायला दोन वर्षे लागली.

या सिनेमातील हिरोची भूमिका आधी अमीर खान याला देण्यात आली होती परंतु त्याने नकार दिल्यामुळे तो रोल सलमान खान याला मिळाला.

या सिनेमात एकंदर १४ गाणी आहेत. त्यापैकी १० गाणी लताजी यांनी गायली आहेत. लताजींच्या आवाजाबद्दल तर बोलायलाच नको. लताजींनी आता ॲवॉर्ड स्वीकारणं बंद केलं होतं. पण 'दीदी तेरा देवर दिवाना' या गाण्यासाठी लोकाग्रहास्तव त्यांनी फिल्म फेअरचे स्पेशल ॲवॉर्ड स्वीकारले.

सिनेमाची लांबी जास्त असल्याने त्यातील १-२ गाणी आधी कट केलेली होती, पण नंतर ती परत सिनेमात घेण्यात आली. लताजी यांनी दहाही गाण्यांचे रेकॉर्डिंग ४ दिवसांत पूर्ण केले. कारण त्यांना नंतर परदेशात प्रोग्रॅमसाठी जायचे होते.

'हम आपके है कौन' हा सिनेमा मुंबईच्या लिबर्टी थिएटरमध्ये १२५ आठवडे सुरू होता. लंडनमधील एका थिएटरमध्ये हा सिनेमा फक्त ३ आठवड्यांसाठी लावलेला होता. कारण नंतर त्या थिएटरचे नूतनीकरण करायचे होते, पण तीन आठवड्यात त्या सिनेमाने एवढी कमाई केली की थिएटरमालकाने तो सिनेमा सलग १५ आठवडे सुरू ठेवला व नूतनीकरणाचे काम पुढे ढकलले.

रेणुका शहाणे या अभिनेत्रीने पूजाचे म्हणजे निशाच्या (माधुरी दीक्षित) मोठ्या बहिणीचे काम केले आहे. तिने अत्यंत सुंदर असा अभिनय केला आहे. तिचे हसणे तर अप्रतिम आहे. त्या खरोखरच्याच बहिणी आहेत की काय असे वाटते. या सिनेमातील रेणुकाचा अपघाती मृत्यू प्रेक्षकांच्या मनाला चटका लावून जातो.

या सिनेमातील हिरो सलमान खान याला या सिनेमामुळे खूप प्रसिद्धी मिळाली.

लल्लू प्रसाद याचे काम लक्ष्मीकांत बेर्डे या मराठी विनोदी अभिनेत्याने केले आहे. त्याचे काम खूपच सुंदर झाले आहे. लक्ष्मीकांतचा जन्म २६ ऑक्टोबर १९५४ रोजी मुंबई येथे झाला. त्याच्यापेक्षा मोठी अशी पाच भावंडे त्याला होती. त्याने लहानपणी लॉटरी तिकिटे विकण्याचे काम केले आहे. नंतर त्याला मराठी साहित्य संघात नोकरी मिळाली. तिथे त्याला मराठी नाटकात छोट्या-छोट्या भूमिका करण्याची संधी मिळाली. 'हम आपके है कौन' हा त्याचा पहिला हिंदी सिनेमा.

या सिनेमातील 'रेडो' या कुत्र्याचे काम तर अफलातून झाले आहे. विवाह समारंभाच्या वेळी लपवलेले बूट शोधून देणे हे काम त्याचेच आणि मुख्य म्हणजे प्रेम व निशा यांचे लग्न जमवून देण्यात रेडो खूपच मदत करतो. या सिनेमाचे शूटींग झाल्यावर माधुरी 'रेडो' ला आपल्या घरी घेऊन गेली. तो तिचा अत्यंत आवडता होता. २००० साली रेडो मरण पावला.

या सिनेमाला सुमधूर, भन्नाट, झगमगते व सळसळते संगीत असल्याने सिनेमा मोठ्या उंचीवर जाऊन पोहोचला आहे. आज २८ वर्षांनंतरही त्या गाण्यांची गोडी आजिबात कमी झालेली नाही आणि होणारही नाही.

राम-लक्ष्मण ही संगीतकारांची जोडी होती. पण राम वारल्यानंतर लक्ष्मण यांनी राम-लक्ष्मण अशाच नावाने या चित्रपटाला संगीत दिले. लक्ष्मण म्हणजे विजय पाटील. राम-लक्ष्मण हे दादा कोंडके यांचे आवडते संगीतकार. अशा या सिनेमाची गोडी आज २८ वर्षांनंतरही कायम आहे.

आजच्या या लेखाने या मालिकेचा मी समारोप करत आहे. आपल्याला मी लिहिलेले लेख आवडले असतील अशी मला आशा आहे. मला आपल्याकडून भरघोस प्रतिसाद मिळाला, त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

**- प्रकाश गणेश गानू,**
मोबा. ९४२१९२९८४७

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी**
**आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**बँक ऑफ महाराष्ट्र, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 20128506183)**
**IFSC Code : MAHB0000326**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

**दिनविशेष (जून, २०२२)**
**वैशाख-ज्येष्ठ शालिवाहन शके १९४४**
**प्लवनाम संवत्सरे**

**सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**
**श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे ।**
**साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**



**गुरुवार दि. २ :** महाराणा प्रताप जयंती, **रविवार दि. ५ :** जागतिक पर्यावरण दिन, **सोमवार दि. ६ :** किल्ले रायगड येथे शिवराज्याभिषेक सोहळा, **शुक्रवार दि. १० :** जागतिक दृष्टीदान दिन, **शनिवार दि. ११ :** साने गुरुजी स्मृतीदिन, **रविवार दि. १२ :** शिवराज्याभिषेक दिन, **मंगळवार दि. १४ :** वटपौर्णिमा, **बुधवार दि. १५ :** कर्नाटकी बेंदूर, **शुक्रवार दि. १७ :** राजमाता जिजाऊ स्मृतीदिन, संकष्ट चतुर्थी (चंद्रो. १०.१९), **शनिवार दि. १८ :** झाशीची राणी लक्ष्मीबाई पुण्यदिन, **सोमवार दि. २० :** संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान देहू, **मंगळवार दि. २१ :** जागतिक योगदिन, दक्षिणायणारंभ, संत ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान आळंदी, **रविवार दि. २६ :** रा.छ.शाहू महाराज जयंती, **गुरुवार दि. ३० :** गुरुपुष्यामृत, श्री टेंब्ये स्वामी पुण्यतिथी.

# जय गंगे । जय भागिरथी ।।

आपलं मनच मुळी रंग गंधाचं अतिलोभी आहे. हा लोभ, हे प्रेम सणातून, उत्सवातून प्रकट होतं. मनात वसलेली देवाची प्रतिमाही 'अबीर गुलाल उधळित रंग नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग ।।' अशी आहे. सृष्टीनं अगदी वाळवंटाकाठी कुठंही खेळ मांडला तरी 'आनंदाचे डोही आनंद तरंगच' उठतात. नवीन वर्षाच्या चैत्र महिन्यात उभी केलेली उंची गुढी वसंताचं स्वागत करते. पुढच्याच महिन्यात ती अक्षय सुखांची समृद्धी देते, ज्येष्ठ महिन्यात सात्विक जगण्याचे कांही मूलमंत्र देते. तुमच्या हातून एक नाही, अगदी दहा पापे घडली तरी सुद्धा ती त्या सर्वांचा परिहार करते. कारण याच ज्येष्ठ महिन्यात पृथ्वीतलावर गंगा अवतरली आहे.

याच पवित्र जलानं आपला दिवस उगवावा म्हणून श्री समर्थांनी गंगेचं भूपाळी रूपात स्तवन केलंय. ते म्हणतात – 'भगिरथीचे स्नान करा । हृदयी स्मरोनी गंगाधरा । चुकेल चौऱ्याऐंशीचा फेरा । ऐसे महात्म्य गंगेचे ।।' आपण सुद्धा स्नान करताना 'पापोऽहं, पापकर्मोऽहं पापत्मा पापसंभव: । त्राहि मां कृपया गंगे । सर्वपाप हरोहर ।।' अशी तिची प्रार्थना करावी, हा संदेश संतांनी दिलाय.

'शिवस्तुती' या रचनेत ६ व्या श्लोकात 'गंगा शिरी दोष महाविदारी' व १४ व्या श्लोकात 'मंदाकिनी मंगल मोक्षकारी ।।' अशी स्तुती आहे.

संत शिवदिन केसरी एका अभंगात म्हणतात –'माझी देवपूजा पाय तुझे गुरुराया । गुरुचरणाची माती तेची माझी भागिरथी ।।'

बावन्न श्लोकी गुरुचरित्रातही या गंगामातेचा 'सगर पुत्राकारणे भगीरथ । गंगा आणितसे भूमंडळी ।। श्लोक ५ वा ।। असा गौरव आहे.

आपले आणखी एक संत भानुदास महाराज – 'शंख चक्रा गदाधरू । कासे सुरंग पीतांबरू ।।' या अभंगात – 'उपमा द्यावी कवणे अंगा । चरणी जन्मली पै गंगा ।।' असा मातेचा निर्देश करतात. विष्णुदेवांच्या उजव्या अंगठ्यापासून गंगा उगम पावली म्हणून मुंजीप्रसंगी बटूच्या – कारण तो वामन अवतार – उजव्या अंगठ्याला नमस्कार करून ते पदतीर्थ घेण्याचा संकेत रूढ झाला. मीराबाई पण एका अभंगात हेच सांगतात – चरणरज महिमा मै जानी । यही चरणसे गंगा प्रकटी । भगीरथ कुलतरनी ।। ज्या भगीरथानं तप करून गंगा पृथ्वीवर आणली, तो गंगोत्री तीर्थावर 'भगीरथ शिळा' म्हणून सर्वांना दर्शन देतो आहे. तुकाराम बीजेनंतर पंचमीच्या दिवशी आकाशातून त्यांचे टाळ, गोधडी व बारा अभंग खाली आले; त्या तुकोबांचा ३ रा अभंग असा आहे – 'तिळभरी दोष नाही । चित्र ते निर्मळ । तुका म्हणे जळ । गंगेचे ।।' पुढे ४ थ्या अभंगात सांगतात – 'जैसी गंगा वाहे। तैसे त्याचे मन । भगवंत जाण तयाजवळी ।।' एवंच काय, गंगेचे पवित्र जल आणि संतमहत्म्यांचे बोल – दोन्ही उद्धारक, दोन्ही पवित्र, एक जलतीर्थ, एक वाक्तीर्थ ।।

ही गंगा रोजच्या वर्तमानातही आहेच की ! एखादी गोष्ट तडीला लावताना किंवा सोडून देताना आपण म्हणतोच ना – 'जाऊ दे, झालं गेलं, गंगेला मिळालं, आता काय वाहिली ती गंगा, राहिलं ते तीर्थ ।।

लहानपणी बाबाला लेकीच्या डोळ्यातलं पाणी आजिबात पाहवत नाही. जरा रडली की तो विचारतो – 'गायी पाण्यावर काय म्हणूनी आल्या? का गं गंगा–यमुनाही या मिळाल्या ।।' कवि बी (मुरलीधर नारायण गुप्ते) हे किती गूज सांगतात? 'गंगा सिंधू सरस्वतीच यमुना।।' या मंगलाष्टकातील शब्दानं आंतरपाट दूर होतो नी वैवाहिक जीवनाचं एक नवं पर्व सुरू होतं. मुलीची पाठवणी करताना कवि पी. सावळाराम आईच्याच भावना बोलतात – 'गंगा यमुना डोळ्यात उभ्या का? जा मुली जा दिल्याघरी तू सुखी रहा ।।' दिल्या घरी सुखी राहण्यासाठीचा हा आशीर्वाद – गंगेसारखाच नितळ, निर्मळ, स्वच्छ ! लेकीचा दिवस पुढे पुढे रामरगाड्यात संपतो, रात्री झोपताना हीच लेक आपलं संस्काराचं गाठोडं उघडते । नी प्रार्थना करते 'पड पड बुडी धरणीवरी । गंगा भगिरथीचे तीरी ।।' कारण आपला विसावा तीच आहे हे तिला आईनं सांगितलंय.

हीच गंगा या कलियुगात सुद्धा राजापूरला येणं – हा एक दैवी चमत्कार आहे. सिंहस्थ पर्वकालात गोदावरीला भेटायला येणं आणि कन्यागत पर्वकाळात कृष्णेला भेटणं – हेही १२/१४ वर्षांत येणारे दुर्मिळ योग. लखनौच्या नॅशनल बोटॅनिकल रिसर्च इन्स्टिट्यूचे डॉ. चंद्रशेखर नौटियाल यांनी प्रमाणाद्वारे सिद्ध केलय की, गंगेच्या पाण्यामध्ये इ–कोलाई बॅक्टेरिया मारण्याची क्षमता आहे

आणि ही शक्ती गंगोत्री व हिमालयातून येते. हेच गंगाजल आपल्याला दोन थेबानं स्वर्गाची वाट दाखवतं, मुक्तीचा प्रवास सुखाचा करवतं.

या स्वर्गीय जलाचं, पवित्र गंगेचं श्रीमत् शंकराचार्य यांनी दोन अष्टाकातून आणि महर्षि वाल्मिकींनी एक स्तोत्रातून स्तवन केलय. पहिली रचना वाल्मिकींची - गंगाष्टक या आठ श्लोकी रचनेत ते म्हणतात - गंगा ही पृथ्वीची शृंगारमाला आहे. शंकरजींच्या शिरावर स्थानापन्न असली तरी, पार्वतीमातेची सवत असली तरी, स्वर्गारोहणाचे वेळी वैजयंतीमाला धारण केलेल्या भगिरथे, मी तुला प्रार्थना करतो की तुझं नाम घेत घेत, तुझ्याकडं दृष्टी लावतच माझा देह तुझ्या चरणी लीन होवो. तुझ्या तीरावरच्या एका वृक्षावर मी पक्षी झालो असतो, कासव मासा म्हणूनही पाण्यात राहिलो असतो - पण मला हत्तीच्या कळपांची भीती वाटते. तुला नमस्कार करून सागंतो, तुझ्या जलाची मला नित्य प्राप्ती व्हावी, कारण ते पापांचा, दुष्कर्मांचा नाश करणारं निरंतर शुभंकारी आहे.'

श्री शंकराचार्यांचं 'गंगाष्टक' हेही आठ श्लोकांचं स्तोत्र आहे. यातही ते अशीच प्रार्थना करतात - 'सकलपाप विनाशिनी, स्वर्गसोपानरूपिणी, तरलतरंगिणी देवी गंगे, माझ्यावर प्रसन्न हो. तुझ्या एका थेंबाचा स्पर्श झाला तरी सगळे कलंक दूर होतात - कारण तू देवपुरीची पवित्र नदी आहेस. जन्हु महर्षींची मुलगी म्हणून जान्हवी, भागिरथानं आणली म्हणून भागिरथी. ब्रह्माच्या कमंडलूतील जलदेवी, पदस्पर्शाने पवित्र झालेली विष्णुपदी, महादेवाच्या जटेवर विराजमान असलेली मनोहारिणी गंगे - तुझा विजय असो. माझा जीव तुझ्यात विलीन झाला तर ते मला इंद्रपदाच्या प्राप्तीपेक्षाही श्रेष्ठ वाटेल. मी तुझं स्तवन कसं करू? तू आपली मला प्रसन्न हो. तुझ्या ठायी माझा भाव नित्य राहो.

चौदा श्लोकी गंगास्तोत्रात आचार्यांनी हाच परम भाव व्यक्त केलाय. 'तुझ्या चरणकमली माझी बुद्धी राहो' ही त्यांची प्रार्थना आहे. मला भवसागरातून तारून ने. तुझ्या तीर्थानं मला मुक्ती दे, कारण तूच माझी गती आहेस, तू त्रिभुवनाची ईश्वरी आहेस, तू मुनिवरांची कन्या आहेस. मला तूं मुक्ती दे. तुझ्या भक्तीचं नित्य अभिवांछित मला फल दे - माझा उद्धार कर.'

श्री माऊली आपल्या ग्रंथदेवी ज्ञानेश्वरीत सांगतात -

**जैसे एकेचि चूतिफळे । इंद्रिया वेगवेगळे ।**
**इसे वर्षे परिमळे । भेटिजे स्पर्शे ।।** (ज्ञा.१८/४७३)

आंबा हे एकच फळ पण ते पांच ज्ञानेंद्रियांना वेगवेगळा पण अप्रतिम अनुभव देतं. तशीच ही गंगा सकलांना परम सुखच देते. इतकं असलं तरी सुद्धा - गंगास्तवनात अजून एक शिरोमणी नांव आहेच. 'पंडितराज जगन्नाथ.' या जगन्नाथाखेरीज गंगेचा रथ ओढलाच जाणार नाही. सारथी आणि रथी दोन्ही तुल्यबळ आहेत - तरीसुद्धा ।।

हे पंडितराज एका तैलंगी राजाकडं संस्कृत भाषा प्रवीण म्हणून दरबारी सेवेत असतात. ज्येष्ठ महिना, गंगा दशहरा व्रत, गंगाजल कसे मिळणार, गंगेची स्तुती तरी कशी करायची? या ऋतुकालोद्भव विवंचनेत राजा व्यथित होतो. तेव्हा पंडितराज गंगेची स्तुती करतात - ते ऐकून राजा धन्य होतो. संतुष्ट होतो. 'तू काहीही माग, मी ते तुला देईनच' राजा फर्मान सोडतो. इथं पंडितराज मोठ्या धैर्यानं 'राजकन्याच द्या.' हे मागतो, तिचा आग्रह धरतो. शब्द दिल्याप्रमाणे नृपकन्या दिली जाते. दोघांचा विवाहही होतो. पण तो समाजाला मान्य होत नाही. त्यांना बहिष्कृत करतात. लोकापवादापासून खूप त्रास होतो. म्हणून उभयता रोज गंगाकिनारी येऊन गंगेचे हे स्तुतीकाव्य उच्चारण करतात, अनेक पारायणं होतात, या सेवेला गंगा प्रसन्न होते. एकेक पायरी वर येऊन त्यांना सामावून घेते. या दोन जीवांचा उद्धार करते.

ही पंडितराज जगन्नाथांची 'गंगालहरी' ५२ श्लोकांची आहे. ४७ श्लोकापर्यंत ही रचना शिखरिणी वृत्तात म्हणता येते. पुढच्या ५ श्लोकासाठी वेगळी वृत्तमात्रा आहे. शेवटचा श्लोक अर्थातच फलश्रुतीचा - गूळ खोबऱ्याचा, प्रसादाचा ।।

'समृद्ध सौभाग्य' सकलवसुधायाः किमपि तन्-' या पहिल्या श्लोकापासून गंगेची स्तुतीसुमनेच उधळली आहेत. ही गंगा पृथ्वीचं सौभाग्य आहे. ते अमृताचं सख्खं भावंड-सहोदर आहे. मानवाच्या अज्ञानवृक्षाचा नाश करण्याची यानं दीक्षाच उचलली आहे. शंकरांच्या उंच जटेवरचे तरंग आमचे पाप नाहीसे करोत, त्रिविध ताप दर्शनानं दूर होवोत. कारण तू साक्षात परब्रह्म आहेस, तू विष्णुपद प्राप्त करून देतेस. कारण पापांचा नाश करून, उद्धार करण्यासाठीच तुझा अवतार आहे. विरक्त, निर्लोभी, निर्मोही शंकरदेवांना तुला जटेत धारण करावेसे

**(पुढील मजकूर पान नं. २४ वर पाहा...)**

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचित आहोत.

– व्यवस्थापक

**अध्याय २ : सांख्ययोग**

**अर्जुन उवाच ।**

वासांसि जीर्णानि यथा विहाय ।
नवानि गृह्णति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि
संयाति नवानि देही ।।

**जैसी वस्त्रें जीर्ण जालियावरी ।**
**पुरुष नवीं वस्त्रें परिधान करी ।**
**तैसे देहभोग त्यजुनि दुरी ।**
**आत्मा आणिके देहीं वर्ते ।।२२।।**

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावक: ।
न चैनं क्लेदयन्त्योपो न शोषयति मारुत: ।।

**तो शस्त्रीं न तुटे कहीं । अग्नीमाजी न जळे पांही ।**
**जळामाजीं बुडणार नाहीं ।**
**वायूने न शोषतो ।।२३।।**

अच्छेद्योऽयमदाह्योऽयम्क्लेद्योऽशोष्य एव च ।
नित्य: सर्वगत: स्थाणु: अचलोऽयं सनातन: ।।

**तो शस्त्रीं न तुटे न शोषे ।**
**जीव सर्वगत व्यापुनी असे ।**
**स्थानवंत अचळ दिसे । परीपूर्ण सनातन ।।२४।।**

अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयमविकार्योऽयमुच्यत ।
तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ।।

**तो न कळे चित्ती नयव्यक्ती ।**
**तयासी अविनाश ऐसें म्हणती ।**
**ऐसे जाणुनी तूं किती । वृथा शोक करिशील ।।२५।।**

अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम् ।
तथापि त्वं महाबाहो नैवं शोचितुमर्हसि ।।

**आतां आत्मा नित्य गुण जो नासे ।**
**हे तुज सकळ ज्ञान असे ।**
**या कारणें अर्जुना पाहता दिसे ।**
**तुज शोकासी कारण नाही ।।२६।।**

जातस्य हि ध्रुवो मृत्यु: ध्रुवं जन्म मृतस्य च ।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ।।

**उपजलियासी असे मृत्यु । मेलियासी जन्म सत्य ।**
**या कारणें हा परिहारार्थ । शोक न करिजे ।।२७।।**

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।
अव्यक्त तनिधनान्येव तत्र का परिदेवना ।।

**भूतें प्रकृतीपासुनी होतीं । मरणपर्यंत व्यक्त दिसती ।**
**मागु ती प्रकृतीमाजी मिळती ।**
**या कारणे वृथा शोक न करिजे ।।२८।।**

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनम् आश्चर्यवद्वदति तथैव चान्य: ।
आश्चर्यवच्चैनमन्य: श्रृणोति,
श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित्।।

**आत्म्यासी आश्रयरूप कोणी देखती ।**
**कोणी आश्चर्यरूप बोलती ऐकती ।**
**ऐकोनिया विसरती । हे आश्चर्य थोर पार्था ।।२९।।**

## शब्दकोडे माहे मे २०२२

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | X | ५ |
| ६ | | | X | ७ | ८ | |
| | X | ९ | १० | X | ११ | |
| १२ | १३ | X | १४ | १५ | X | |
| १६ | | | X | १७ | १८ | |
| X | | X | १९ | | | X |
| २० | | २१ | X | | X | २२ |
| X | २३ | | २४ | X | २५ | |
| २६ | X | २७ | | | X | |

**आडवे शब्द :**

१. बक्षीस, ६. ओळ, रांग याला हिंदी प्रतिशब्द, ७. धाक, दहशत, ९. कोंब, अंकुर, ११. हत्ती, १२. एक श्वास रोग, १४. जमिनीवरील कर, १६. X X X च्या लग्नाला सतराशे साठ विघ्न, १७. सैनिक, १९. संकट, २०. समझोता, २३. दिवस, दिन, २५. सौ चूहे खाकर बिल्ली चली X X को, २६. X गणेशाय नमः, २७. धोबी, परीट

**उभे शब्द :**

१. तांबड्या पंखाचा पोपट, २. रिकामा, रिक्त, ३. स्त्रियांचे पायात घालायचे आभूषण, ४. पुरुषांचे नेसण्याचे रेशमी वस्त्र, ५. स्थानापन्न झालेला, ८. चीड, संताप, १०. पृथ्वी, धरती, १३. भूक तृप्त न करणारी फळे, १५. सत्ता, कारकीर्द, १८. ही X X दूर जाते (गाण्याची ओळ), २१. एक प्रकारचे रेशमी कापड, २२. केसात माळायची फुलांची छोटी माळ, २४. सत्व, X X, तम (तीन गुण).

**– सौ. मधुरा संतोष शिधये,**
मोबा.९८१९७७०९७०

## सांगा पाहू?

१. 'मुमताज बेगम जहा देहलवी' या सुप्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेत्रीचे 'मधुबाला' असे नामकरण कोणी केले?
२. रक्तातील लोहाच्या कमतरतेमुळे कोणते आजार होतात?
३. कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी काय वापरतात?
४. कोणत्या फळामध्ये 'सी' व्हिटॅमिन असते?
५. 'केसरी' व 'सुधारक' या वृत्तापत्रांचे संपादक व संस्थापक असलेल्या गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म कधी व कोठे झाला?
६. मेंदूतील कोणत्या गुणामुळे आयुष्यात जुळवून घेणे शक्य होते?
७. पितळेच्या भांड्यात अन्न शिजवल्याने अन्नातील किती टक्के पोषणमूल्य टिकून राहते?
८. दार्जिलिंगमध्ये मिळणाऱ्या प्रसिद्ध सुपाचे नाव काय? ते कशापासून बनवतात?
९. डिझेन इंजिन वापरून जगातील पहिली पाणबुडी कोणी व कधी बनवली?
१०. लंबकाचे पहिले घड्याळ कोणी व कधी बनविले?

(उत्तरे अन्यत्र पहा.) **– सौ. मधुरा संतोष शिधये,**
मोबा.९८१९७७०९७०

### शब्दकोडे माहे मेचे उत्तर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ च | २ क्र | ३ वा | क | X | ४ नि | ५ रा |
| ६ र | य | त | X | ७ त | रं | ग |
| वी | X | ८ ड | ९ र | X | १० कु | X |
| X | ११ कु | X | १२ द | १३ ह | श | १४ त |
| १५ खु | श | ख | ब | र | X | म |
| १६ शा | ल | X | द | X | १७ स | X |
| म | X | १८ ता | ली | १९ म | खा | २० ना |
| त | X | टी | X | रू | X | री |

### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

### (लेखांक चौदावा)

त्या दुःखावेगातून पहिल्यांदा सावरला तो ज्ञानेश्वर. म्हणाला, ''दादा, आई-बाबा परतून येणार नाहीत, हे नक्की झालं. आपल्या आयुष्यांच्या रेषा आपणच आखल्या पाहिजेत, हेही नक्की झालं. कदाचित आपल्या चौघांचं आयुष्य एका रेषेत जाणार नाही; पण ज्या गोष्टीसाठी आई-बाबांनी मृत्यूला जवळ केलं, ते शुद्धिपत्र मिळवण्याचा आपण कसोशीनं प्रयत्न करायचा. सोपान, मुक्ता पुसा ते डोळे. आई-वडिलांशिवाय जगण्याचा विचार आपण केला होताच. आता आपण सवय करून घेऊ या. समाजाच्या हेटाळणीनं आपल्या आई-बाबांचा जीव घेतला. ही हेटाळणी आता आपल्याही वाट्याला येईल; पण आपल्याला आपलं उद्दिष्ट गाठायचं असेल, ध्येयाप्रत पोहोचायचं असेल, तर अशा लहान-सहान अडचणी बाजूला सारून आपल्याला उभं राहिलं पाहिजे. ईश्वरानं जे नैमित्तिक कर्म करण्यासाठी आपल्याला जन्माला घातलं आहे ते कर्म आपलं जीवितकार्य आहे, असं समजून आपण पार पाडू. निवृत्तीदादा, मी काही चुकीचं तर बोललो नाही ना?' ज्ञानेश्वरानं निवृत्तीला विचारलं. निवृत्तीच्या डोळ्यातल्या पाण्याची जागा आता कौतुकानं घेतली. ज्ञानेश्वराबद्दलचं कौतुक त्याच्या निवृत्तीच्या डोळ्यांतून अश्रूंबरोबर ओसंडून वाहत होतं. ज्ञानेश्वराच्या बोलण्यानं वातावरणही थोडसं निवळलं. सोपान, मुक्ता रडायचे थांबले आणि ज्ञानेश्वराचे बोलणं लक्षपूर्वक ऐकायला लागले, निवृत्ती म्हणाला, ''ज्ञानदेवा, अगदी योग्य ते बोललास तू. आई-बाबांचं अशा रीतीनं निघून जाणं हे आपल्याला कितीही क्लेशकारक असलं, तरीही हे सत्य आपल्याला स्वीकारावं लागेलच आणि हे सत्य नुसतं स्वीकारून चालणार नाही, तर ते अंगीकारलंही पाहिजे. त्याशिवाय आपल्या आयुष्याला गती मिळणार नाही आणि प्रगतीही होणार नाही. यापुढची वाटचाल आपली आपल्यालाच करायची आहे. यासाठी आत्मनिर्भर होणं गरजेचं आहे. सोपान, मुक्ता तुम्ही दोघं अजून लहान आहात. मी आणि ज्ञानेश्वर मोठे आहोत, म्हणून तुम्हा दोघांच्या पालन-पोषणाची जबाबदारी आमची आहे. मी आणि ज्ञानेश्वर त्याची व्यवस्था करू. तुम्ही दोघांनी मात्र जितका शक्य असेल, तितका विद्याभ्यास करावा आणि हळूहळू स्वयंपाकाची सिद्धता शिकून घ्यावी. मुक्ते, विनायक भटजींच्या आई कावेरीआक्का आपल्या आईच्या चांगल्या स्नेहातल्या होत्या. त्यांच्याकडून तू काही गोष्टी शिकून घे. आजचा दिवस आपल्या बालपणातला शेवटचा दिवस आहे, असं आपण समजू या. उद्याचा सूर्य आपल्यासाठी एक वेगळाच नवा प्रकाश घेऊन येणार आहे, हे निश्चित. तेव्हा आता उद्याच्या नव्या सूर्योदयाचा विचार करत आजची रात्र घालवू या.'' सोपान आणि मुक्ता निवृत्तीचं बोलणं लक्ष देऊन ऐकत होते. आई-बाबा कधीच परतणार नाहीत, या दुःखाची तीव्रता आता थोडी कमी झाली. तोच मुक्तीनं विचारलं, ''ज्ञानादादा, मगाशी तू म्हणालास की, आपल्याही नशिबी हेटाळणी येणार आहे, म्हणजे काय? आणि आपल्या नशिबी ती का येणार आहे?'' मुक्तीनं असं विचारलं आणि सोपानानंही मान हलवली. मुक्तीनं जणू त्याच्या मनातलाच प्रश्न विचारला. त्या प्रश्नाचा रोख ओळखून ज्ञानेश्वर म्हणाला, ''मुक्ता, ज्या कारणासाठी आपल्या आई-बाबांची हेटाळणी झाली, त्याच कारणासाठी आपल्यालाही हेटाळणी सोसावी लागेल. एकदा संन्यास घेऊन पुन्हा संसाराला लागलेल्या एका व्रतस्थ पित्याची आपण लेकरं

आहोत; पण म्हणूनच समाज आपल्याला 'संन्याशाची पोरं' म्हणून धिक्कारेल, आपली हेटाळणी करेल; पण हीच संन्याशाची पोरं काय करू शकतात? हे याच समाजाला आपण दाखवून द्यायचं आहे. तरच आपल्या आई-वडिलांचं स्वप्न आपण साकार केलं, हे सिद्ध होईल. सोपान-मुक्ता तुम्ही दोघंही लहान आहात; पण आई-बाबा नाहीत, म्हणून स्वत:ला तुम्ही निराधार समजू नका. हे दोन तुमचे मोठे भाऊ तुमची सगळी जबाबदारी घ्यायला समर्थ आहेत. तेव्हा आता निश्चिंतपणानं निजा. उद्यापासून आपल्या आयुष्याचं एक वेगळं पर्व सुरू होतंय. आपण चौघं मिळून त्याला सामोरं जाऊ या.'' बोलता-बोलता ज्ञानेश्वराचा आवाज किंचित कापरा झाला. निवृत्तीनं त्याच्या पाठीवर थोपटलं. सोपानाचा आणि मुक्ताचा हात धरून दोघंही आत आले. निवृत्तीनं वाकळ अंथरली. ज्ञानेश्वरानं मुक्ताईला थोपटायला सुरुवात केली, तर सोपानानं निवृत्तीचा हात घट्ट धरला. चंद्र काही काळ ढगाआड गेला असावा. तेवढ्यात अंधारानं आपलं साम्राज्य वाढवलं आणि या चार लेकरांना निद्रादेवीनं अलगद कुशीत घेतलं. आई-वडिलांच्या वियोगानं व्याकूळ झालेली, त्यांच्या विरहानं घायाळ झालेली, रडून-रडून शिणलेली, विचार करून थकलेली, स्वत:ला आत्मनिर्भर करण्याचा मानस मनी बाळगूनही स्वत:चं अवघं जीवन भविष्याच्या स्वाधीन केलेली ही चार अश्राप बालकं आता एकमेकांच्या संगती-सोबतीनं जगणार होती, आपापलं भविष्य चितारणार होती. समाजानं केलेल्या प्रत्येक हेटाळणीला, प्रत्येक तिरस्काराला उत्तर देणार होती. या क्षणी निद्रादेवीच्या स्वाधीन होताना तरी मनोमन त्यांनी हाच संकल्प सोडला होता. तो पूर्णत्वाला जाणार की नाही? गेला तर कधी? कसा? याचं उत्तर फक्त आणि फक्त नियतीकडे होतं; पण या चौघांची दुर्दम्य इच्छाशक्ती आणि केलेला संकल्प सिद्धीस नेण्याची त्यांची धडपड पाहता नियतीलासुद्धा या प्रश्नाचं उत्तर लवकरच द्यावं लागणार होतं, हे स्पष्टपणे दिसत होतं. भवितव्याविषयी समोर सगळा अंधार पसरला असतानाही या चौघांचं निश्चिंतपणे झोपणं, हे याचीच ग्वाही देत होतं.

## ६

सकाळ झाली. खरोखरच आजचा सूर्य काही वेगळंच वातावरण घेऊन आला होता. त्याच्या किरणांमध्ये दाहकता कमी, आणि ऊब जास्त होती. सोपानानं डोळे उघडले. आई समोर नाही, हे त्याच्या लक्षात आलं आणि पुढच्या क्षणाला त्याला परिस्थितीची जाणीव झाली. आदल्या रात्री निवृत्ती-ज्ञानदेव यांनी सांगितलेला शब्दन्‌शब्द त्याला आठवला आणि तो ताडकन अंथरुणावर उठून बसला. त्यानं मान वळवून पाहिलं. मुक्ता शांतपणे निजली होती. झोपेत खुदकन हसत होती. 'किती निष्पाप आहे ही,' सोपानाच्या मनात आलं. 'देवा, तिची ही निरागसता अशीच ठेवण्यास मला सामर्थ्य दे.' त्याने बसल्या जागेवरून देवाला हात जोडले आणि उठून उभा राहिला. निवृत्तीदादा आणि ज्ञानादादाची चाहूल लागत नव्हती. याचा अर्थ ते पहाटेच गंगेच्या घाटावर गेले असावेत, असा सोपानानं निष्कर्ष काढला. आता त्याला बसून चालणार नव्हतं. शहाण्यासारखं वागायचं, आत्मनिर्भर व्हायचं कालच ठरलं होतं; पण आपण नक्की काय करावं, हे त्याला सुचेना. त्यानं आठवलं, आई काय करत होती ! त्यानं तेच करायचं ठरवलं. त्यानं कोपऱ्यातली केरसुणी घेतली आणि ते छोटंसं अंगण आरशासारखं झाडून लख्ख केलं. ते झाल्यावर त्यानं डोणीतले पाणी आणून अंगणात शिंपडलं. पुन्हा तो झोपडीत आला आणि त्याने झोपडी झाडायला सुरुवात केली. त्याच्या झाडण्याने झोपडीत किंचीत धूळ उडायला लागली आणि ती धूळ मुक्तीच्या नाकात जाऊन सटासटा शिंका देत मुक्ती उठून बसली. उठून बसल्या-बसल्या डोळे चोळत तिने ''आई-आई'' अशा हाका मारायला सुरुवात केली. आईची ओ आली नाही म्हटल्यावर तिने डोळे उघडले आणि सोपानाला केर काढताना बघून तिलाही भान

आलं. 'आई नाही' या कटू सत्याची जाणीव तिला झाली आणि तीही अंथरुणात उठून उभी राहिली. मग लाडिकपणे तक्रारीच्या सुरात म्हणाली, ''काय रे सोपानदादा, सगळी धूळ माझ्या नाका-डोळ्यांत गेली ना ! झोप मोडली ना माझी !'' तिच्या आवाजातला रुसलेपणा, तिचे फुगलेले गाल, शिंकून-शिंकून लाल झालेले नाक, हे बघितल्यावर सोपानाला हसूच फुटलं. म्हणाला, ''मुक्ते, हे बरं झालं. तुला रोज कसं जागं करावं हा प्रश्न मला पडणार नाही. मला आता चांगली युक्ती सापडली आहे !'' त्याचं बोलणं ऐकून मुक्ती म्हणाली, ''मुळीच नाही. उद्यापासून तुला ती संधीच मिळणार नाही, बघच तू. उद्यापासूनच मीच तुझ्या आधी उठेन आणि तुझ्या नाका तोंडात धूळ उडवेन.'' तिच्या त्या अविर्भावाची सोपानाला पुन्हा गंमत वाटली. खरंच आजचा दिवस, आजचा सूर्य वेगळाच होता. खरचं त्याच्या किरणांत दहाकतेपेक्षा ऊब जास्त होती. म्हणून आईवेडी ही दोन पोरं आई नसल्याचं सत्य स्वीकारून उगवलेल्या दिवसाला हसत-हसत सामोरी गेली होती.

सोपाना, मुक्ताची अशी चेष्टामस्करी चालली असताना निवृत्ती, ज्ञानदेव परत आले. त्यांना असं मधूनच परतलेलं बघून सोपानाला आश्चर्य वाटलं; पण आज दोघं जण काहीतरी निराळेच दिसत होते. त्यांच्याकडे निरखून पाहिल्यावर सोपानाच्या लक्षात आलं की, दोघांच्याही खांद्याला माधुकरीची झोळी आहे. दोघांच्याही झोळीत थोडंफार काहीतरी पडलेलं दिसत होतं, पण त्याहीपेक्षा सोपानाला खटकली, ती त्यांच्या चेहऱ्यावरची उद्विग्नता. 'एरवी शांत आणि समंजस असलेले हे आपले दोन भाऊ, आई-वडिलांचे समर्पण ज्यांनी सहजपणे स्वीकारलं, ते हे दोघं जण त्यांच्या चेहऱ्यावर आज एवढी वेदना, एवढी उद्विग्नता कशी काय?' असा प्रश्न सोपानाला पडला. विचारावं की विचारू नये, या संभ्रमात तो असतानाच ज्ञानेशाने रागारागानं खांद्यावर अडकवलेली झोळी काढून जमिनीवर ठेवली. तोच निवृत्ती म्हणाला ''हं, हं ज्ञानदेवा, सबूर सबूर ! जे कार्य आपलं नैमित्तिक कर्म ठरणार आहे, त्याचा मुक्त मनानं स्वीकार करायला नको का? खरंतर मलाही काहीसा राग आला आहे. उद्विग्नता आली आहे; पण ज्या गोष्टींना पर्याय नाही, त्या गोष्टी स्वीकारल्याच पाहिजेत. मला मनाला खंत वाटली असूनही मी ती गोष्ट स्वीकारली आहे.'' निवृत्तीचं बोलणं ऐकत ज्ञानदेव खाली मान घालून उभा होता. सोपानाला कळेना काय झालंय? ज्ञानेश्वर एवढा का रागवला आणि अपरिहार्य असलेल्या अशा कोणत्या नैमित्तिक कर्माबद्दल निवृत्तीदादा बोलतोय. त्यानं विचारलं, ''निवृत्तीदादा ! काय झालं? असं काय घडलं, की ज्यामुळे ज्ञानादादाचा संयम सुटला?'' निवृत्तीनं सोपानाकडे पाहिलं. त्याच्या निरागस चेहऱ्यावर असंख्य प्रश्न होते. सोपानाला घडलेला प्रसंग सांगावा की सांगू नये, असा संभ्रम निवृत्तीला पडला; पण त्याच्या मनानं तो तत्काळ सोडवला. झाली घटना सोपानाला समजणं आवश्यकच होतं. आज ना उद्या त्याच्यावरही हा प्रसंग येणारच होता. ज्ञानदेव थोडासा तरी जाणता होता; पण असा प्रसंग सोपानाच्या बाबतीत घडला असता, तर त्याची समजूत घालणं अवघड झालं असतं. अशा प्रासंगांना तोंड देण्याची नव्हे, ते कानामागं टाकून त्यातून सहज पार होण्याची सवय शरीराबरोबर मनालाही लागणं गरजेचं होतं. आणि ही सवय सगळ्यांना लागणं त्यातूनही गरजेचं होतं. तेव्हा काय घडलं ते सोपानाला समजायलाच हवं होतं. या सगळ्या विचारांची आवर्तनं निवृत्तीच्या मनात फिरली आणि त्यातून निष्कर्षाप्रत आल्यावर निवृत्तीचा चेहरा शांत झाला. त्यावरची उद्विग्नता नाहीशी झाली. एका वेगळ्याच भावनेने त्याचा चेहरा उजळला. एका वेगळ्याच भूमिकेनं त्याचे डोळे चमकले. वेगळी भूमिका? होय आता निवृत्तीदादा एका वेगळ्या भूमिकेत शिरणार होता. एका वेगळ्या भूमिकेतून प्रकटणार होता. ती भूमिका होती शिक्षकाची, अध्यापकाची, गुरुची. ज्ञानेशाच्या प्रश्नाला उत्तरं देताना ही भूमिका त्यानं कित्येकदा अंगीकारली होती, पण ज्ञानेशाचा शिक्षक होणं वेगळं होतं. कारण

सामाजिक व्यवहाराचं, समाजाच्या सकृत आणि विकृतही चालीरीतीचं, त्याला ज्ञान होतं. त्याचे प्रश्न, हे ईश्वर, त्याची भक्ती, त्याचे मार्ग, सृष्टिचक्राचं, खगोलाचं, अवकाशाचं, अध्यात्माचं, कुंडलिनीचं, प्राणतत्त्वाचं मार्गदर्शन याबद्दल असत. आणि गहिनीनाथांनी हटयोगाची दीक्षा दिल्यामुळे हे सगळं सांगणं निवृत्तीदादाला सोपं जात असे. पण इथं शिक्षक बनायचं होतं, छोट्या सोपानाचं आणि कुठल्याही उच्च विद्याविभूषित शिक्षकाला जाणत्या विद्यार्थ्यांना शिकवणं फार सोपं जातं, पण त्याच शिक्षकाला एखाद्या लहान बालकाला शिकव म्हटलं तर ते जमणार नाही. कारण लहान बालकाला काहीतरी शिकण्याची गोडी लावणं मोठं कठीण काम असतं. आणि जन्म देण्याबरोबरच आई ते सहजतेने करते म्हणून ही आई सर्वश्रेष्ठ गुरु ठरते. आता या क्षणी सोपानदेवाची आई–बाबा आणि शिक्षक ही तीनही नाती निवृत्तीदादाला वठवायची होती. नुसती वठवायची नव्हती, तर निभावूनही न्यायची होती. म्हणूनच सोपानानं जेव्हा ''निवृत्तीदादा काय झालं रे?'' असा प्रश्न विचारला तेव्हा आता हीच वेळ आहे सोपानाला या जगाचा व्यवहार शिकवण्याची हे निवृत्तीदादानं ओळखलं आणि अत्यंत संयमाने; पण समर्थपणे त्याने शिक्षकाच्या भूमिकेत शिरायचं ठरवलं. (क्रमश:)

**– सौ. मंजुश्री गोखले,**

मोबा. ८८०५३५५२००

## योगवर्गाचे आयोजन

शिवाजी पेठ, मंगळवार पेठ, महाद्वार रोड, अंबाबाई मंदिर परिसरातील नागरिकांसाठी योग विद्याधाम, कोल्हापूर आणि कोल्हापूर चित्पावन संघ यांचे संयुक्त सहकार्याने कोल्हापूर चित्पावन संघ हॉल, गुरुमहाराज वाड्यानजीक, मिरजकर तिकटी, कोल्हापूर येथे रोज सकाळी ६ ते ८ या वेळेत योगासन वर्ग सुरू झाले आहेत. तरी इच्छुक योगसाधकांनी सदर वर्गाचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी खालील नंबरवर संपर्क साधावा.

**सौ. सिद्धी बकरे – 8275606627,**
**श्री. रोहित गवळी 9657963475**

## सांगा पाहू उत्तरे

१. 'मुमताज बेगम जहा देहलवी' या सुप्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेत्रीचे 'मधुबाला' असे नामकरण तत्कालिन अभिनेत्री देविका राणी यांनी केले.
२. रक्तातील लोहाच्या कमतरतेमुळे अशक्तपणा व कमी रक्तदाब हे आजार संभवतात.
३. कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी चांदीचे आयोडाईड वापरतात.
४. संत्री, मोसंबी, डाळिंब, आवळा व पेरु या फळांमध्ये 'सी' व्हिटॅमिन असते.
५. 'केसरी' व 'सुधारक' या वृत्तपत्रांचे संपादक व संस्थापक असलेल्या गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म १४ जुलै १८५६ रोजी कराड तालुक्यातील 'टेंभू' या गावी झाला.
६. मेंदूतील 'न्यूरोप्लास्टिसिटी' या गुणामुळे आयुष्यात जुळवून घेणे शक्य होते.
७. पितळेच्या भांड्यात अन्न शिजवल्याने अन्नातील ९७% पोषणमूल्य टिकून राहते.
८. दार्जिलिंगमध्ये मिळणाऱ्या प्रसिद्ध सुपाचे नाव आहे 'आलू मिमी'. बटाटा, टोमॅटो व स्थानिक भाज्यांपासून ते बनवतात.
९. डिझेल इंजिन वापरून जगातली पहिली पाणबुडी फ्रेंच लोकांनी १९०४ साली बनवली.
१०. लंबकाचे पहिले घड्याळ १९५६ साली 'क्रिस्तियान हायगेन्स' या डच शास्त्रज्ञाने बनवले.

**– सौ. मधुरा संतोष शिधये,**

मोबा. ९८१९७७०९७०


**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

# गोखले ब्रदर्स

**सराफी दुकान**

**शनिवार, दि. 4 जून, पुष्य नक्षत्र**
**गुरुवार, दि. 30 जून, गुरुपुष्यामृत**

**आपलं दुकान**
**महाद्वार रोडवर,**
**0231–2546585**

# लहान मुले नैसर्गिक पद्धतीने भाषा शिकू शकतात

## (लेखांक तिसरा)



संपदाला पालकत्वाची प्राचीन भारतीय समज काय होती याबद्दल तिच्या आजोबांचे शब्द आठवले. मनुष्याला पाच वाढीचे टप्पे आहेत – शैशव, बाल्यावस्था, किशोरा-वस्था, यौवन आणि वार्धक्य. पहिले तीन टप्पे, शैशव, बाल्य आणि कौमार हे पालकांच्या सुरक्षिततेत असतील. परंपरेनुसार, पालक मुलाला मुळाक्षरे, अंक, गणित आणि भाषेच्या शिक्षणाच्या मूलभूत गोष्टींमध्ये प्रारंभ करतात. अशा प्रकारे, व्यक्तिमत्व घडवण्याची पहिली निर्णायक जबाबदारी निःसंशयपणे, शैशव आणि बाल्य काळात पालकांवर असते. 'मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्यदेवो भव ।' प्रत्येक मूल अद्वितीय आहे आणि पालक त्यांच्या मुलांना इतर कोणाहीपेक्षा जास्त ओळखतात. शैशव आणि बाल्यादरम्यान पेरलेले बीज अखंडपणे मुलाच्या जीवनाचा मार्ग ठरवितात. त्यांनी एका सुभाषिताची माहिती दिली.

**'गृहमेव प्रथम पाठशाला, जनन्येव प्रथम गुरुः,**
**धन्याः जनन्याः ज्ञाताः ।'**

'याचा अर्थ घर ही पहिली शाळा आहे; आई ही पहिली गुरु असते, धन्य ते ज्यांना आई शिकवते.'

संपदा तिच्या लहान मुलांच्या शिक्षण प्रक्रियेचा आनंद घेत होती. मैत्रिणींशी झालेल्या चर्चेतून तिची उत्सुकता दिसून येत होती. संतोषने दाखवलेला तितकाच उत्साह, पालकत्वाच्या अनुभवांची चांगली सुरुवात करत होती. संपदाला आणखी एक आश्चर्य वाटले, जेव्हा तिची मैत्रिण वैशाली हिने तिच्या ३ वर्षाच्या मुलीचे शिकण्याचे परिणाम शेअर केले जी निर्दोषपणे वडिलांसोबत इंग्रजी, आजीसोबत मराठी आणि शेजारच्या मुलांसोबत हिंदी बोलते. तिन्ही भाषांमधली तिची कम्फर्ट लेव्हल पाहून संपदाने वैशालीला तिच्या मुलीसाठी अवलंबलेल्या प्रशिक्षण पद्धतींबद्दल विचारले. वैशालीने संपदाला मुलांना 'नैसर्गिक पद्धतीने कसे शिकायचे' हे शिकवण्याच्या एका विलक्षण संधीची ओळख करून दिली, जी बाळासाठी वाचन शिकवणे, गणित करणे किंवा पोहणे यांसारख्या कोणत्याही योग्य प्रशिक्षणाच्या अगदी सोप्या पद्धतीने प्रक्रिया केली जाते.

वैशालीने माहिती दिली की, तिला फिलाडेल्फियाच्या, 'द इन्स्टिट्यूट फॉर द अचिव्हमेंट ऑफ ह्युमन पोटेंशियल'च्या ग्लेन डोमन यांच्या 'हाऊ टू टीच युवर बेबी टू रीड : द जेंटल रिव्होल्यूशन' या पुस्तकाची भारतीय आवृत्ती एक अद्भुत भेट मिळाली आहे. हे पुस्तक वाचल्यानंतर मुलाच्या शिकण्याच्या

क्षमतेबद्दलची तिची समज बदलली आणि पुस्तकात दिलेल्या सोप्या पद्धती पालन केल्याने तिच्या मुलीची भाषा क्षमता वाढली. कोणतेही मूल जी भाषा बालपणी ऐकते आणि सहजतेने शिकते, ती म्हणजे मातृभाषा. म्हणून, कोणतेही मूल प्रथम शब्द ऐकते, नंतर भाषेची वर्णमाला किंवा लिपी माहित नसताना ते शब्द बोलण्याचा प्रयत्न करते. पालकांना खूप आनंद होतो, जेव्हा त्यांचे मूल पहिले शब्द आई, बाबा, पापा बोलते. मूल जसजसे मोठे होते, आई-वडील, आजी-आजोबा यांच्याकडून छोट्या छोट्या गोष्टी ऐकते आणि शब्द वापरून वाक्याची रचना शिकते. मातृभाषा बोलण्याचे व्याकरण कधीच शिकवले जात नाही, परंतु आजूबाजूचे लोक ती भाषा बोलतात, ते ऐकताना मुलाला ते समजते.

मराठी, गुजराती, तमिळ, फ्रेंच, स्पॅनिश किंवा इंग्रजी भाषा असो, जगभरातील कोणत्याही पालकांचा हाच अनुभव आहे. म्हणूनच, भाषा शिकण्याची ही एक नैसर्गिक, वैज्ञानिक आणि उत्तम चाचणी केलेली पद्धती आहे. पहिली पायरी म्हणजे ऐकणे आणि त्यानंतर बोलणे, पुढची पायरी म्हणजे लहान वाक्यांसह कथा ऐकणे परंतु कथा दृश्यमान करण्यासाठी उच्चारात्मक प्रभाव असणे. अशा कथांमधून मेंदूच्या विकासाचे महत्त्वाचे पैलू, वाक्यांची रचना, व्याकरणाचे नियम आणि व्हिज्युअलायझेशन तंत्र शिकले जाते.

मुलांसोबत काम करत असताना, डोमनने शोधून काढले की दररोज फक्त ९० सेकंद वापरून, पालक त्यांच्या बाळाला वाचायला शिकवू शकतात. पालक हे सर्वोत्कृष्ट शिक्षक आहेत आणि त्यांच्या मुलांवर असलेले त्यांचे प्रेम आणि आत्मविश्वासच त्यांच्या मुलांना सर्वोत्तम प्रेरणा देतात. जेव्हा पालक आणि मूल दोघेही आनंदी असतात तेव्हाच शिकणे घडते. जगभरातील हजारो पालकांनी हे घडवून आणले आहे. म्हणून पालकांनी विश्वास ठेवला पाहिजे आणि आपले बाळ वाचू शिकेल असा आत्मविश्वास असणे आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे पालकांनी बाळाची परीक्षा घेऊ नये, बाळाचे काळजीपूर्वक निरीक्षण केले पाहिजे आणि हे हळूहळू लक्षात येईल की बाळ शिकत आहे.

वैशालीने फ्लॅश कार्ड तंत्राबद्दल सांगितले, ग्लेन डोमनच्या पुस्तकात दिलेले सर्वात महत्वाचे टप्पे. प्रति कार्ड एक शब्द मोठ्या आकारात लिहिलेला, लाल रंग दाखवला जातो आणि दिवसातून तीन वेळा बाळाला वाचून दाखवला जातो. हे पद्धतशीर योजनेद्वारे केले जाते. प्रथम फळांचे संच, शरीराचे अवयव, क्रियापद, इ. शब्दांची मागणी करा. पाच शब्दांच्या संचाने सुरुवात करा, त्यानंतर एक शब्द जोडून आणि दररोज एक शब्द काढून टाका. याप्रमाणे, बाळाला बरेच शब्द वाचले जाईपर्यंत वेगवेगळ्या प्रकारच्या तीन संचांसह शिकवले जाऊ शकते. येथे मुख्य तंत्र जलद प्रक्रिया, सातत्य, वाचनाचा आनंद आणि पुरेशी पुनरावृत्ती आहे. जेव्हा चांगल्या संख्येने शब्द पूर्ण होतात, तेव्हा आपण 'पिवळे केळे', 'उंच शिडी' सारखे दोन शब्द वापरू शकतो, 'केळी पिवळी आहेत' असे तीन शब्दी वाक्य वापरू शकतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या प्रशिक्षण मार्गाचे नियोजन, प्रक्रिया आणि रचना करताना कुटुंबातील सदस्य एकमेकांना मदत करतात, मग पालकांना शिकवणे आणि बाळाला वाचणे सोपे आणि आनंददायक होते.

ग्लेन डोमनच्या पुस्तकात दिलेली अशी सोपी तंत्रे वैशालीला चांगली समजली आणि तिने ती आपल्या कुटुंबातील सदस्यांना समजावून सांगितली, जेणेकरून बाळाच्या आजूबाजूची प्रत्येक व्यक्ती त्याच्या आवडीची भाषा बोलू शकली आणि बाळाला त्या सर्व भाषा सहज शिकता आल्या. पालकांनी राहण्यासाठी विशिष्ट ठिकाण पसंती दिल्याचे हे एक महत्त्वाचे कारण असावे, कारण त्यांना माहीत होते की खाद्यशैली, भाषा, संस्कृती, कुटुंबातील सदस्यांचे तसेच शेजाऱ्यांचे निरीक्षण करून बाळाला त्या चांगल्या सवयी लागतात.

पुढची महत्त्वाची पायरी म्हणजे कोणीतरी मुलाला एक कथेचे पुस्तक वाचून दाखवणे, तिथे मूल

मजकुरावर फक्त तर्जनी हलवते. पहिल्या काही पुस्तकांमध्ये बाळाच्या क्रियाकलापांची छायाचित्रे समाविष्ट असू शकतात. मुलांच्या पुस्तकांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात लहान वाक्यांसह बरीच चित्रे आहेत, यामुळे शब्दांचा त्यांच्या अर्थाशी परस्पर संबंध सुनिश्चित होतो, चित्रांचा वापर करून समजावून सांगितले जाते, ज्यामुळे बाळाच्या लहान मेंदूसाठी गोष्टींना त्यांच्या नावांशी जोडण्यास मदत होते.

शाळांमध्ये, इंग्रजी भाषा शिकवणे अगदी विरूद्ध मार्गावर चालते, प्रथम A, B, C, D... आणि नंतर स्पेलिंग byheart karun शब्द लिहिणे, जे पूर्व-प्राथमिक शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांनी अनुभवलेले भाषा शिकण्याचे सर्वात कठीण टप्पे आहेत. जर शिक्षक वर्गात शिकवताना चांगले इंग्रजी बोलत असतील तर मुले चांगले इंग्रजी शिकतात, अन्यथा नंतर व्यावसायिक अभ्यासक्रमाचे विद्यार्थी म्हणून त्यांना संभाषण कौशल्याचे विशेष प्रशिक्षण आवश्यक असते. आज क्वचितच मुलांना पुस्तके वाचण्याची सवय असते आणि त्यामुळे ते कधीही शास्त्रीय उच्चार तंत्र किंवा उत्तम वत्कृत्व विकसित करत नाहीत, जे कोणत्याही क्षेत्रातील यशाचे सर्वात महत्त्वाचे कौशल्य आहे. माहिती आणि कम्युनिकेशन या युगात, मुलांना भाषा शिकण्याचे नैसर्गिक, वैज्ञानिक आणि सहजतेने शिकवणे, शिकण्याचा आनंद घेणारी सर्जनशील पिढी तयार करण्यास मदत करेल.

विविध भाषा शिकणे मेंदूच्या संज्ञानात्मक विकासासाठी उपयुक्त आहे, असे मत आघाडीच्या वैद्यकीय संस्थांमधील डॉक्टरांनी व्यक्त केले आहे. आरोग्य तज्ञ म्हणतात की जर एखाद्या व्यक्तीला दोनपेक्षा जास्त भाषा येत असतील तर मेंदूचे वेगवेगळे भाग सक्रिय होतात ज्यामुळे एकाग्रता आणि मेंदूची शक्ती वाढण्यास मदत होते. भाषा आपल्या मेंदूला चालना देते, आपले विचार तयार करते आणि जटिल संवाद शक्य करते. आपल्या भाषेसाठी अद्वितीय शब्द, अभिव्यक्ती, आपण जग कसे पाहतो आणि कसे समजून घेतो हे मुख्यत्वे परिभाषित करतात.

संपदाने ठरवले की तिच्या बाळाला भाषा शिकण्याची आणि वाचनाचा आनंद घेण्याची संधी मिळावी यासाठी ती सर्व पावले उचलेल. या नवीन शक्येतेने मंत्रमुग्ध होऊन, तिने तिच्या बाळाच्या जन्मानंतर प्रशिक्षित करण्यासाठी आवश्यक असलेली सामग्री शोधण्यासाठी आणि आवश्यक असल्यास ती तयार करण्यासाठी तिच्या वेळेचा सदुपयोग करण्यास सुरुवात केली. संतोषने सर्व योजना तयार केल्या आणि त्यांच्या बाळाला फ्लॅश कार्ड दाखवण्यासाठी दररोज एक सत्र घेण्याची ऑफर दिली. डोमन इंटरनॅशनल या वेबसाईटवरून त्या दोघांना बरेच काही शिकायला मिळाले. प्राचीन भारतीय संस्कृती आणि आधुनिक तंत्रांचा मिलाफ करून चौथ्या पिढीचे कुटुंबात स्वागत करण्याचा उत्साह पाहून संपदाच्या आजी-आजोबांना खूप आनंद झाला.

**- इंद्राणी केळकर,**
मोबा. ९१६४६८५०६७

## कोल्हापूर चित्पावन संघाचा वर्धापनदिन



शनिवार, दि. ४ जून २०२२ रोजी कोल्हापूर चित्पावन संघाचा ५८ वा वर्धापन दिन साजरा होणार आहे. याप्रसंगी संघाच्या कार्यालयात सकाळी श्री सत्यनारायण महापूजा संपन्न होणार असून दुपारी ४ ते ७ वाजेपर्यंत सर्व सभासद व हितचिंतकांनी कोल्हापूर चित्पावन संघाच्या कार्यालयात येऊन तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, ही विनंती.

**आपले नम्र,**

**केदार वसंत जोशी** — कार्यवाह
**सदानंद दिनकर मराठे** — अध्यक्ष

**आणि सर्व संचालक मंडळ सदस्य**

# छत्रपती शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ

## (लेखांक पहिला)

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले. ६ जून १६७४ रोजी शिवाजी राजांचा राज्याभिषेक झाला. ते सिंहासनाधीश्वर झाले. स्वत: छत्रपती झाल्यानंतर राजांनी स्वराज्याच्या राज्यकारभाराचा आराखडा तयार केला. वेगवेगळ्या क्षेत्रासाठी वेगवेगळ्या माणसांची नेमणूक केली. त्यात अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली. जाती पातीच्या पलिकडे जाऊन राजांनी स्वराज्याशी असलेली निष्ठा, पराक्रम, बुद्धीचातुर्य आणि ईमानीपणा याच आणि याच गुणांचा केवळ विचार केला आणि अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली. या अष्टप्रधान मंडळाच्या सहाय्याने राजांनी अत्यंत यशस्वी आणि दक्ष राज्यकारभार केला. या अष्टप्रधान मंडळात सात जण ब्राह्मण होते. त्यांची नावे अशी – १. पंतप्रधान : मोरोपंत त्रिंबक पिंगळे, २. पंत अमात्य : रामचंद्र निलकंठ, ३. पंत सचिव : अण्णाजी पंत दत्तो, ४. मंत्री : दत्ताजीपंत त्रिंबक, ५. सेनापती : हंबीरराव मोहिते, ६. पंत सुमंत : रामचंद्र त्रिंबक, ७. न्यायाधीश : निराजीपंत रावजी, ८. पंडितराव दानाध्यक्ष : मोरेश्वर पंडित.

**'प्रधान अमात्य सचिव मंत्री, सुमंत न्यायाधीश धर्मशास्त्री, सेनापती त्यात असे सुजाणा,**
**अष्टप्रधानी शिवमुख्यराणा'**

या सात जणांपैकी राजांचे अत्यंत जवळचे, अत्यंत विश्वासाचे आणि अत्यंत निष्ठावान प्रधान म्हणजे मोरोपंत पिंगळे. आज त्यांच्याबद्दल उपलब्ध असलेली माहिती आपण घेणार आहोत. मोरोपंत पिंगळे यांच्या घरातील कोणी पूर्वज हे शहाजीराजांच्या पदरी होते.

**मोरोपंत त्र्यंबक पिंगळे**

मोरोपंत त्र्यंबक पिंगळे छत्रपती शिवाजी महाराजांचे एक प्रमुख सरदार व दिवाण. हे देशस्थ ब्राह्मण असून यांचे वडील कर्नाटकामध्यें शहाजी राजांच्या चाकरीत होते. पुढें शहाजीराजांनी शिवाजी महाराजांच्या सोबत पुण्याचा कारभार पाहण्यासाठी ज्या मंडळींची नेमणूक केली त्यात मोरोपंत होते ते कर्नाटकातून महाराष्ट्रांत आले व पुणे जहागिरीचा कारभार पाहू लागले. पहिल्यांदा त्यांना पुरंदर किल्ल्याचा कारभार पाहण्यास सांगितला गेला व नंतर प्रतागपड बांधण्याचें काम त्यांच्याकडे सोपवले गेले. या नंतर मोरोपंत हे तहहयात शिवाजी महाराजांच्या मागे सावलीसारखे उभे होते. अफझल-खानाच्या प्रकरणात मोरोपंतांनी आपल्या पायदळाच्या साहाय्यानें खानाचें पार येथील सर्व सैन्य पराभूत केलें.

पुढें (१६६२) शिवाजी महाराजांनी त्यांचे तत्कालिन पेशवा शामराजपंत यांना सिद्दीला पराभूत करण्यास पाठवलें असतां त्यांचाच पराभव झाल्यानें महाराजांनी मोरोपंतांना सिद्दीचा पराभव करण्यासाठी पाठवले, त्यांनी सिद्दीचा पराभव केला व अनेक कार्यांत उत्तम कामगिरी बजावल्यानें शिवाजी महाराजांनी मोरोपांतांना पेशवाई व कायमस्वरूपी प्रतापगडच्या देवीचा कारभार पण दिला. शिवाजी महाराजांवर सिद्दी जोहर चालून आला तेंव्हा पुरंदर, सिंहगड, प्रतापगड व त्यांच्या परिसरातील प्रदेशाच्या रक्षणाची जबाबदारी मोरोपंतांकडे होती. पुढल्या दोन वर्षांनी भर पावसाळ्यांत पंतांनी जुन्नरच्या उत्तरेकडील मोंगलांचे कित्येक किल्ले घेतले, परंतु पुरंदरच्या तहानें त्यांतील बरेच किल्ले मोंगलांस परत मिळाले.

इ.स.१६६६ मध्यें शिवाजी महाराज आग्र्याला जाण्यासाठी निघाले त्यावेळी ज्या तीन गृहस्थांच्या हाती त्यांनी आपल्या राज्यकारभाराची सर्व सूत्रें दिली होती; त्यांत मोरोपंत हे मुख्य होते. शिवाजी महाराजांस औरंगजेबाने आग्र्यात बंदीत टाकून तह मोडल्याचें पंतांना समजलें व त्याच सुमारास महाराजांकडून मिळालेल्या किल्ल्यांची शक्य तेवढी तटबंदी पाडून किंवा तेथें संरक्षणार्थ थोडेसे लोक ठेवून जयसिंग औरंगाबादला परत गेला; त्यामुळें पंतांनी

ताबडतोब ते सर्व किल्ले आपल्या ताब्यांत घेऊन त्यांपैकी नादुरुस्त झालेल्यांची डागडुजी केली (१६६७) आणि याप्रमाणें महाराज परत येण्यापूर्वीच मोंगलांकडे गेलेले बहुतेक किल्हे हस्तगत केले. पुढें १६७२ मध्ये शिवाजी महाराजांनी मोरोपंत व प्रतापराव गुजर यांची साल्हेरच्या कुमकेकरतां २०००० फौज देऊन रवानगी केली. या लढाईच्या वेळी त्यांनी साल्हेरजवळ मोंगलांचा सरदार इखलासखान याच्या सैन्यावर मोठा विजय मिळवून शत्रूच्या सैन्याची भयांकर कत्तल केली व जव्हारचें राज्य खालसा केलें. १६७४ मध्ये मोरोपंतांना पोर्तुगीजांकडून चौथ वसूल करण्यासाठी कल्याणास पाठवलें होतें.

पुढें (१६७६) शिवाजी महाराज कर्नाटकांत गेले तेव्हां त्यांनी आपल्या पश्चात पंतांना राज्याचा कुलअखत्यार देऊन आण्णाजी दत्तो सचिव यास पंतांशी सहकारत्वानें वागण्याची आज्ञा केली. या वेळच्या या दुतंत्री कारभारामुळें पुढें पंत व आण्णाजी यांच्यामध्यें मत्सर उत्पन्न झाला. जालना लुटून आल्यावर पट्टा किल्ल्याच्या आसपास मोंगलांचे जे २७ किल्ले होते त्यांतील शक्य तेवढे काबीज करून घेण्याकरतां पंतांची रवानगी झाली. पंतांनी ते किल्ले घेऊन सर्व खानदेशभर आपली फौज पसरून त्या मुलुखांतून खंडणी वसूल केली.

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर (१६८०) प्रथम ते सोयराबाईंच्या पक्षास मिळाले होते. म्हणून संभाजीराजांनी त्यांना बंदित ठेवलें. पांतु पुढें ते लवकरच संभाजीराजांच्या पक्षास मिळाले तेव्हां संभाजीराजांनी त्यांना बंधमुक्त करून पेशवाईच्या जागी पुन्हां कायम केलें. संभाजीराजांनी कैदेंतून मुक्त केल्यावर ते फार दिवस जगले नाहीत. शिवाजी महाराजांच्या नंतर ६ महिन्यांतच ते वारले.

पंतास अनेक वेळां मोंगलांच्या मुलुखांत पाठवण्यांत आलें होतें, त्या त्या वेळी त्यांनी विलक्षण पराक्रम केले. शिवाजी महाराजांचे हेतू व धोरणें त्यांनी इतकी उत्तम अवगत केली होती कीं, हाती घेतलेल्या प्रत्येक कामांत त्यांना निश्चित यश मिळत असे. युद्धशास्त्र व राज्यकारभार या बाबतीत ते अत्यंत वाकबगार होते. १६६८-६९ च्या सुमारास मुलुखाचे व फौजेचे जे नवीन कायदे शिवाजी महाराजांनी केले; त्यांत पंतांचा मुख्यत्वेंकरून सहभाग होता. पंतांनी मराठी राज्याची पहिली जमीनधारा पद्धती अंमलांत आणली.

त्यांचा भाऊ केशवपंत हाही शूर व मुत्सद्दी होता. शिवाजी महाराज व संभाजीराजांच्या कारकीर्दींत कर्नाटकचें संरक्षण करण्याची कामगिरी त्याच्याकडे होती. मोरोपंतांच्या पश्चात त्याचा मुलगा निळोपंत यास संभाजीराजांनी पेशवाई दिली (१६८०). त्यांनी आपल्या वडिलांप्रमाणे संभाजीराजांच्या व राजाराम महाराजांच्या आणि दुसऱ्या शिवाजीराजांच्या कारकीर्दित राज्याच्या उपयोगाची अनेक कामे केली. निळोपंतांचा ओढा ताराबाईच्या पक्षाकडे असल्यामुळें शाहू महाराजांनी आपल्या राज्याभिषेकप्रसंगी (१७०८) निळोपंतांचा भाऊ बहिरोपंत यास आपला पेशवा केले.

पुढें (१७१३) बहिरोपंतास शाहू महाराजांनी कान्होजी आंग्रे यांना हुकमतीत आणण्याकरतां सैन्य देऊन पाठवलें. परंतु आंग्रे यानें त्याचा पराभव करून त्यास बंदित टाकलें. तेव्हां बाळाजी विश्वनाथाना आंगऱ्यांवर धाडण्यांत आलें. बाळाजीनी शाहू व आंगऱ्यांच्यात समेट करून देऊन बहिरोपंतांची सुटका करवली. म्हणून शाहू महाराजांनी बहिरोपंतांस पेशवाईवरून काढून ती बाळाजी विश्वनाथाना दिली.

(म. रियासत भा. १,२; डफ. मराठयांच्या इतिहासाची साधने)

**– गुरुप्रसाद कानिटकर,** मोबा. ७७५५९१३७९१



## सभासदांसाठी भक्तनिवास नोंदणी विनामोबदला

आपली गैरसोय टाळण्यासाठी कोल्हापूर मुक्कामासाठी आपल्या भक्तनिवासाची आगावू नोंदणी करा.

तात्काळ नोंदणीसाठी **संपर्क : श्री. गिरीश जोग फोन : ९४०४६०९५९७, ९८२२०३८८९७**

येताना आधार कार्ड, पॅनकार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स अशा फोटो व पत्ता असणाऱ्या शासकीय दस्तऐवजाची प्रत जमा करणे आवश्यक आहे.

# ब्राह्मण समाज ‘अभिमानास्पद व्यक्ती गौरव !’




ब्राह्मण समाजातील अभिमानास्पद व्यक्तींची माहिती समाजाला व्हावी ह्या हेतूने ‘ब्राम्हण समाज गौरव’ नावाचा फेसबुक पेज सुरू केला आहे . ह्या पेज वर ब्राह्मण समाजासाठी अभिमानास्पद व्यक्तींचा शाब्दिक गौरव होतो.

आज आपण पंचांगकर्ते दाते परिवाराची माहिती पाहणार आहोत .

जगातील सर्वांत प्राचीन संस्कृती म्हणून भारताचे नाव विशेषतः घेतले जाते. या भारतीय संस्कृतीत अनेकविध परंपरा आहेत. अनेक ठिकाणी त्याचे स्वरूप वेगवेगळे असले, तरी त्यातील भारतीय संस्कृतीत एकतानता-एकसूत्रीपणा आढळतो. भारतीय कालगणना सांगणारी तसेच भारताच्या परंपरेत संस्कृतीचा आरसा असणारी गोष्ट म्हणजे पंचांग. भारतात कालगणनेसाठी अनेकविध पंचांगांची नोंद आहे. महाराष्ट्रातसुद्धा अनेक पंचांगे चालत आहेत; पण त्यात सोलापूरच्या दाते पंचांगाचे नाव अग्रगण्यतेने घेतले जाते.

पंचांगात आकाशाचा आरसा दिसला पाहिजे असे लोकमान्य टिळकांनी सन १९०६ मध्ये भरलेल्या ज्योतिष-परिषदेत सांगितले होते. त्याकाळी पंचांगांत एकवाक्यता नव्हती. गणित सर्वत्र एकच असता फरक का? हा प्रश्न कै. लक्ष्मण गोपाळ ऊर्फ नाना दाते यांनी धसास लावून शके १८३८ म्हणजे १९१६-१७ मध्ये पहिले दाते पंचांग काढून त्यात एकवाक्यता करण्यास सुरुवात केली. १९४६-४७ पासून कै. धुंडिराज (अण्णा) दाते हे पंचांगाच्या कामात मदत करू लागले. त्यांचे हे योगदान फार महत्त्वपूर्ण ठरले.

पं. लक्ष्मण गोपाळ ऊर्फ नाना दाते यांनी शके १८३८ म्हणजेच सन १९१६-१७चे पहिले दाते पंचांग प्रसिद्ध केले. पंचांगाचे गणित करणे त्यावेळी तसे अवघड होते. त्यावेळी कॅलक्युलेटर्स, संगणक काहीही नव्हते. सर्व गणिते हातांनी करायला लागत होती. पं. नाना दाते बऱ्याच वेळा अशी गणिते भिंतीवर करीत असत. दाते हे मूळचे कोकणातील! गणपतीपुळे जवळच्या नेवरे गावचे! त्यांचे घराणे हे वैदिक होते. दोनशे वर्षांपूर्वी कोकण सोडून त्यांचे पूर्वज देशावर आले. दाते पंचांगामुळे सोलापूरचे नाव साऱ्या देशभर झाले. श्री. नाना दाते यांनी पंचांग तयार करण्यासाठी स्वतःच कोष्टके तयार केली होती. पंचांग छापून ते विक्री करण्यासाठी प्रारंभी सुमारे आठ वर्षे गावोगावी जाऊन पंचांगाची विक्री करीत. पं. नानांचे सुपुत्र पं. धुंडिराजशास्त्री दाते सन १९४५ पासून नाना यांस पंचांगाच्या कामी पूर्णपणे मदत करू लागले. त्यांनी पंचांगसुधारणा होण्यासाठी महान योगदान दिले. शके १८७२ पासून पं. धुंडिराजशास्त्री दाते हे सूर्यसिद्धांत-ग्रहलाघवचे स्थूलगणित सोडून दृक्प्रत्ययतुल्य सूक्ष्मगणिताप्रमाणे पंचांग करू लागले. त्यांनी स्वतः

सूक्ष्मगणित स्वीकारलेच शिवाय इतर पंचांगकर्त्यांना भेटून त्यांना सूक्ष्मगणित स्वीकारावयास लावले. त्यांचे हे महान योगदान होते. सन १९५४ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी कॅलेंडर रिफॉर्म कमिटीची स्थापना केली. महाराष्ट्रातून त्या समितीमध्ये पं. धुंडिराजशास्त्री यांना निमंत्रित करण्यात आले. त्यांचे धाकटे बंधू श्री. श्रीधरपंत हे पंचांगकार्यात मोलाची मदत करीत होते. पं. धुंडिराजशास्त्री दाते यांचे दुसरे महान कार्य म्हणजे घटिका पळांऐवजी कलाक मिनिटांचा वापर! त्यांनी इतर पंचांगकर्त्यांनाही कलाक मिनिटांचा वापर करण्यासाठी आग्रह केला. सन १९५५ पासून दाते पंचांगात घटिका पळांऐवजी कलाक मिनिटांत वेळा देण्यास प्रारंभ झाला. शके १९०४ मध्ये क्षयमास आला होता. त्यावेळी अहमदाबाद येथे भरलेल्या सभेत पंचांगकर्त्यांचे एकमत होत नव्हते. त्यावेळी पं. धुंडिराजशास्त्री दाते यांचे मत प्रमाण म्हणून मानण्यात आले. त्यांनी पंचांगकार्याबरोबरच अनेक ठिकाणी व्याख्याने दिली. सण-उत्सवांचा अर्थ ते वैज्ञानिक दृष्टीने पटवून देत असत.

१९७७ पासून पं. धुंडिराजशास्त्री दाते यांचे चिरंजीव श्री. मोहनराव पंचांग तयार करण्याची धुरा समर्थपणे सांभाळीत आहेत. तसेच त्यांना श्रीधरपंत दाते यांचे चिरंजीव श्री. विनयराव हे पंचांगगणितासाठी मदत करीत आहेत. दाते पंचांगकर्त्यांची चौथी पिढी श्री. मोहनरावांचे चिरंजीव श्री. ओंकार हेही पंचांगकार्यात आपल्या वडिलांना मदत करीत असतात. दाते पंचांग हे आता दिनदर्शिका स्वरूपातही प्रसिद्ध होत असते. तसेच कन्नड आणि हिंदी भाषेतही प्रसिद्ध होत असते.

शतकमहोत्सवी दाते पंचांगास आमच्या शुभेच्छा! नव्या पिढीला आधुनिक भाषेत वैज्ञानिक दृष्टिकोनातून सण-उत्सवांची माहिती देण्याची सध्या गरज आहे. दाते पंचांग हे महान कार्य करू शकेल असा विश्वास वाटतो.

पंचांगकर्ते दाते परिवाराची माहिती देताना 'ब्राम्हण समाज गौरव' ला अभिमान वाटत आहे.

–

---

# ।। श्री राम समर्थ ।।

**(पान नं. ११ वरून पुढे...)**

वाटले - हा तुझा गुण किती महान आहे. १९ व्या श्लोकांत जगन्नाथ सांगतात - 'सत्ता, संपत्ती, मदिरा याने धुंद बनलेल्या राजापुढं लाचारपणानं वागल्यानं मी खूप त्रासलोय, संतप्त झालोय. माझ्या मूर्खपणानं माझं कल्याण केलं नाही. तू तुझ्या मांडीवर घेऊन मला झोपव, मला बराच वेळ शांत झोपायची इच्छा होतेय. कारण आई, या जगात सर्वांच्या कामना करण्यास, त्यांची पूर्तता करण्यात तू सदा जागृत आहेस - म्हणून नेहमी ब्रह्मदेव पण समाधीत दंग राहो, विष्णु शयन करो, शंकर नृत्य करो, यज्ञ-दान-तप न करता सुद्धा तू सर्वांचे कल्याणच करतेस. यातील नंतरचा ४८ वा श्लोक गंगेचे उत्तम ध्यान असणाऱ्या वर्णनाचा आहे. ही गंगा शरदऋतूतील चंद्रप्रमाणे शुभ्र आहे. मुकुटावर चंद्रकला शोभायमान आहे. एका हाती अमृतकलश, एका हाती कमळ, एक हात वरदमुद्रा व चौथा हात अभयमुद्रेने शोभतो. गंगेचे वस्त्रही शुभ्र आहे. सुंदर आभूषणे धारण करणाऱ्या, शुभ्र मकरावर वसलेल्या तुझे जो ध्यान करतो - तो सदैव आनंदीच राहतो.' पुढच्या श्लोकात हेच वर्णन व हीच आनंदी राहण्याची कामना व्यक्त केली आहे. माझी उपेक्षा न करता, उद्धार कर ही विनंती केली आहे. फलश्रुतीतही हीच विनंती आहे. गंगामाता सर्वांना प्रेम-संपदा देवो ही कामना व्यक्त केली आहे.

हीच पवित्र गंगा ही ज्येष्ठ महिन्यातील प्रतिपदा ते दशमी (यावर्षी ता. ३१ मे ते ९ जून पर्यंत) या दहा दिवसांत आपल्या दहा पापांचा नाश करते - हे गंगादशहरा व्रत, चोरी-हिंसा-परदारागमन हे पाप शरीर करतं, कठोर बोलणं, असत्य बोलणं, चहाडी करणं, संबंध नसता बडबडणे-हे पाप वैखरी-वाणी करतं, दुसऱ्याच्या द्रव्याची आशा, अनिष्ट विचार, खोटा आग्रह ही पापे मनाकडून होतात. भक्तीचं जल मन स्वच्छ करतं, स्वाध्याय जलतीर्थानं बुद्धी स्वच्छ होते. शरीराचा मल तर पाण्यानेच जातो. गंगा पुण्य सलिला - हे सर्व कार्य करते.

अविरत कर्मयोग करणाऱ्या भगिरथाच्या प्रयत्नाने अवतरलेली ही भागिरथी कर्मयोगाचा चिरंतन संदेश आहे. गंगालहरी हे या पवित्र जलाचं स्तवन स्तोत्र आहे.

ही शब्दस्मरणी सर्वांवर कृपेचा अविरत वर्षाव करो.

।। जय जय जयतु गंगे ।।

**- सौ. किरण भा. फडणीस**

मोबा. ९४२३८१५३९७

# कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलींची माहिती - जून २०२२)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ऐश्वर्या<br>O +ve | कोकणस्थ | २६/७/९६<br>५.१ | कौंडिण्य, वृश्चिक जेष्ठा, प्रथम आद्य, राक्षस | M.Com. | आकाशवाणी सांगली हंगामी उद्घोषक | मा.प्रा.<br>--- | राजेंद्र नारायण पटवर्धन<br>दिनानाथ चौक, सांगली.<br>९४०५५६२८५६ |
| २. | मधुरा<br>A +ve | देशस्थ | ७/२/९५<br>५.३ | धनंजय मेष भरणी, प्रथम मध्य, मनुष्य | B.E. CDAC (DAC) | पुणे येथे नोकरी | मा.प्रा.<br>७०,८३३/- | अनुजा सुहास नंदगावकर<br>पाचगांव रोड, कोल्हापूर<br>९५१८९५७७६८ |
| ३. | वृषाली<br>B +ve | कोकणस्थ | २३/१०/९४<br>५.३ | शांडिल्य, वृषभ रोहिणी, २ रे अंत्य, मनुष्य | M.Sc. (Maths) | बँक ऑफ इंडिया, कोडोली | मा.प्रा.<br>२५,०००/- | गणेश दामोदर सोमण<br>मोरे कॉलनी, कोडोली,पन्हाळा<br>८८३०७८१४६२ |
| ४. | श्रृती<br>O +ve | कोकणस्थ | २२/४/९३<br>५.४ | कौशिक, मेष भरणी, २ रे मध्य, मनुष्य | M.Pharm | नोकरी | मा.प्रा.<br>७०,०००/- | किशोर शिवराम कानिटकर<br>शाहुनगर, इचलकरंजी.<br>९४२२०४७४१५ |
| ५. | आदिती<br>B +ve | देशस्थ | ३१/१२/९२<br>५.४ | विश्वामित्र, मीन पूर्वाभाद्र.,चतुर्थ आद्य, मनुष्य | M.Tech Elct. & Katthak | --- | मा.प्रा.<br>--- | अरुण बाळकृष्ण धरणगांवकर<br>जरगनगर रोड, कोल्हापूर<br>९५०३६५१९४६ |
| ६. | मयुरी<br>--- | देशस्थ | ११/७/९१<br>५.४ | वसिष्ठ, मिथुन आर्द्रा, २ रे आद्य | MCA | --- | मा.प्रा.<br>--- | शशिकांत दिवाण<br>ढोकी, उस्मानाबाद.<br>८८५७०८२३१८ |
| ७. | सायली<br>--- | कऱ्हाडे | २७/१०/९०<br>५.५ | जमदग्नी, मकर श्रवण, २ रे अंत्य, देवगण | M.Sc. Stat. | सरकारी वर्ग 'अ' अधिकारी | मा. प्रा.<br>--- | सायली देवस्थळी<br>कोल्हापूर.<br>९६७३९४६९०३ |
| ८. | अश्विनी<br>--- | देशस्थ | १९/०१/८९<br>५.७ | जयवंतायन, वृषभ मृग, दुसरे मध्य, देवगण | MF Ph.D Running | मुंबई येथे नाकेरी | मा.प्रा.<br>८०,०००/- | अशोक मुकुंद सोलेगावकर<br>जुने शहर, अकोल<br>९८५०३६७०५८ |
| ९. | अमृता<br>--- | देशस्थ | १२/४/८८<br>५.३ | भारद्वाज, मकर धनिष्ठा, मध्य पहिले, राक्षस | B.E. Compu | पुणे येथे नोकरी | वा.प्रा.<br>२४ लाख | रमेश कुलकर्णी<br>फुरसंगी, पुणे.<br>९९२२९६११६२ |
| १०. | मानसी<br>--- | देशस्थ | २७/३/८७<br>५.१ | काश्यप, कुंभ शततारका, २ रे आद्य | B.E. | अक्कलकोट येथे नोकरी | मा.प्रा.<br>--- | मानसी सतीश कुलकर्णी<br>सोलापूर.<br>७४४८१८१३३६ |



**पियूषा सतीश जोशी**
**(कोकणस्थ)** (B +ve)

**जन्मतारीख :** ४/१०/१९९६
**नोकरी :** पुणे येथे M.K.R.K.Firm
**मा.प्रा.** : १५,०००/- **उंची :** ४.११
**पत्ता : श्री. सतीश केशव जोशी**
माळी कॉलनी, टाकाळा, कोल्हापूर.
मोबा. 9922272959, 9623337500
**अपेक्षा :** सरकारी नोकरी किंवा प्रायव्हेट एम.एन.सी. कंपनी/कोकणस्थ
स्थावर : स्वत:चे घर

| **शिक्षण :** B.Com. M.Com., DIT | गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|---|
| | शांडिल्य | मिथुन | आर्द्रा | ३ रे | आद्य | मनुष्य |

**प्राजक्ता प्रकाश देशपांडे**
**(देशस्थ यजु)** (O +ve)
**(नाममात्र घटस्फोटीत)**

**जन्मतारीख :** २२/६/१९८६
**नोकरी :** चिंचवड पुणे येथे
**मा.प्रा.** : १५,०००/- **उंची :** ५.३
**पत्ता : श्री. प्रकाश वासुदेव देशपांडे**
प्लॉट नं. १६, परदेशीनगर, रेल्वे स्टेशनजवळ पंढरपूर. मोबा. ९८२२४१४८८
**अपेक्षा :** पुणे येथे सर्व्हिस, इंजिनिअर, घटस्फोटीत, विनाअपत्य,प्रथमवर,पुणे येथे फ्लॅट असावा.

| **शिक्षण :** M.Com. MSCIT, Tally, Banking Software | गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|---|
| | वसिष्ठ | धनु | पूर्वाषाढा | १ ले | मध्य | राक्षस |

# कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलांची माहिती - जून २०२२)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पवन<br>O +ve | देशस्थ | ७/५/८८<br>५.७ | गार्ग्य, धनू<br>पूर्वाषाढा, ४ थे<br>मध्य, मनुष्य | B.Sc.<br>Eletc. | कॅनरा<br>बँक | मा.प्रा.<br>५६,०००/- | गंधाली निनाद जोशी<br>पाचगांव, कोल्हापूर.<br>९९६०२९७९१० |
| २. | सागर<br>--- | देशस्थ | १७/१२/८९<br>५.९ | वसिष्ठ, कर्क<br>आश्लेषा,<br>अंत्य, राक्षस | I,T,I. | नोकरी | मा.प्रा.<br>२०,०००/- | सागर प्रमोद जोशी<br>नागाळा पार्क, कोल्हापूर.<br>९३२५००५६१६ |
| ३. | प्रतीक<br>--- | देशस्थ | २०/१/९०<br>५.१० | काश्यप, तूळ<br>विशाखा, प्रथम<br>अंत्य, राक्षस | B.A.<br>B.Ed. | स्वत:चा<br>व्यवसाय | मा.प्रा.<br>३०,०००/- | प्रसाद लक्ष्मण टाकवडेकर<br>पाचगाव, कोल्हापूर.<br>९८६०८७६३९५ |
| ४. | मकरंद<br>B +ve | कोकणस्थ | २/१०/९१<br>६.० | काश्यप, कर्क<br>पुष्य, पहिले<br>मध्य, देव | BSL<br>LLB | वकिली<br>व्यवसाय | मा.प्रा.<br>६०,०००/- | धनंजय वासुदेव गोखले<br>मु.पो.डहाणु, जि.पालघर<br>९९७५२९०२५६ |
| ५. | स्वरूप<br>--- | देशस्थ | १२/१०/९२<br>५.११ | काश्यप, मेष,<br>अश्विनी, पहिले<br>आद्य, देव | MBA | एच.आर.<br>सांगली<br>येंथे | मा.प्रा.<br>२०,०००/- | चंद्रशेखर गजानन गोसावी<br>गावभाग, सांगली.<br>९३५९८३८१५५ |
| ६. | आकाश<br>O +ve | देशस्थ | १३/६/९३<br>५.८ | वसिष्ठ, मीन,<br>उ.भाद्रपदा, ३रे<br>मध्य, मनुष्य | B.E.<br>Civil | स्वत:चा<br>व्यवसाय | मा.प्रा.<br>३०,०००/- | अनंत गुरुनात मुजुमदार<br>मंगळवार पेठ, कोल्हापूर.<br>९०४९५६१६५० |
| ७. | विपुल<br>A + ve | देशस्थ | ३/१२/९४<br>५.४ | काश्यप, वृश्चिक<br>ज्येष्ठा, तिसरे<br>आद्य, राक्षस | B.Tech. | न्युक्लिअर<br>पॉवर कार्पो<br>भारत सरकार | वा.प्रा.<br>१३ लाख | किरण सदाशिव शिराळकर<br>जयसिंगपूर.<br>९०९६८५९०३४ |
| ८. | रोहीत<br>O + ve | देशस्थ | २९/१२/९५<br>६.२ | भारद्वाज, मीन<br>रोहिनी, ३ रे<br>अंत्य, देव | Dip. in<br>Photo<br>graphy | नोकरी+<br>व्यवसाय | वा.प्रा.<br>३ लाख | धनंजय श्रीपाद जोशी<br>रमणमळा, कोल्हापूर<br>९९२२५८५१५१ |
| ९. | मंदार<br>O +ve | कोकणस्थ | २३/७/९६<br>५.६ | शांडिल्य, तूळ<br>चित्रा, चतुर्थ<br>मध्य, राक्षस | B.C.A.+<br>CCNA | पुणे येथे<br>नोकरी | मा.प्रा.<br>५०,०००/- | विद्याधर मुकूंद जोशी<br>राजोपाध्ये नगर, कोल्हापूर<br>९३७११२३०३१ |
| १०. | शुभम<br>B +ve-- | देशस्थ | १७/१/९७<br>५.७ | कौशिक, मेष,<br>भरणी, तिसरे<br>मध्य, मनुष्य | B.Pharm<br>Nutri. &<br>Dietics | नोकरी | मा.प्रा.<br>४०,०००/- | महेश कुंभोजकर<br>घोरपटे नाट्यगृहाजवळ<br>इचलकरंजी.९८५०११४७२२ |

**अतुल विष्णु ओगले**
**(कोकणस्थ)** (   +ve)

**जन्मतारीख :** ३/४/१९९०
**नोकरी :** झेनवर्क टेक्नॉलॉजीज
**मा.प्रा. :** ३५,०००/- **उंची :** ५.७
**स्थावर :** २ घरे व शेती देवगड
**पत्ता : श्री. विष्णु राजाराम ओगले**
मु.पो.दहिबाव, ता. देवगड, जि.सिंधुदुर्ग
मोबा. 9403563992, 9356871190
**अपेक्षा :** अनुरूप

**शिक्षण :** MCA

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| काश्यप | मिथुन | पुनर्वसू | २ रे | आद्य | मनुष्य |



**विश्वनाथ गजानन देशपांडे**
देशस्थ (   +ve)

**जन्मतारीख :** १४/०९/१९९९
**नोकरी :** स्टार बझार (टाटा ग्रुप ऑफ कंपनी, कोल्हापूर)
**मा.प्रा. :** २०,७६५/- **उंची :** ५.९
**पत्ता : श्रृती पवनकुमार कुलकर्णी (बहीण)** कणेरीवाडी, कोल्हापूर.
मोबा. 9343906575, 7972846039
**अपेक्षा :** अनुरूप, शिक्षणाची अट नाही, घर सांभाळून राहणारी चालेल.

**शिक्षण :** B.A

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| काश्यप | तुळ | स्वाती | ४ थे | अंत्य | देव |

## कोल्हापूर चित्पावन व समस्त ब्राह्मण समाजातर्फे भगवान श्री परशुराम जन्मोत्सव



सुवर्णमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघाच्या वतीने प्रतीवर्षाप्रमाणे मंगळवार दि,३ मे २०२२ रोजी भगवान श्री परशुराम जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. गेली दोन वर्षे कोरोनाच्या महामारी व शासनाच्या नियमांमुळे हा सोहळा साजरा करता आला नाही. मात्र यावेळी गेल्या दोन वर्षाची करस भरून हा लोकोत्सव करण्याचा संचालक मंडळाने निर्धार केला होता. कोल्हापूरातील समस्त ज्ञाती संस्था व शेकडो ज्ञाती बंधू, भगिनी युवक, युवती व श्री परशुराम भक्त या सोहळ्यास आवर्जुन उपस्थित होते. यावेळी युवक युवतींचा सहभाग लक्षणीय होता. वुई फॉर अवर्स या संघटनेचे तरूणांनी आपले सर्वात जास्त योगदान दिले. नेहमीप्रमाणे सकाळी आपल्या संघातील भगवान श्री परशुराम यांच्या मुर्तीस संघाचे सहकार्यवाह श्री संतोष साने यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. वे.मू. व ॲड. अमोघ भागवत यांनी पौरोहित्य केले. सायं. ५ वा श्री महालक्ष्मी स्त्रोत्र मंत्रपठण वर्ग यांच्या वतीने स्त्रोत्र पठण केले यामध्य श्री गुळवणी व त्यांचे सहकारी यांनी सहभाग घेतला. सायं.५.३० वा श्री मयूर कुलकर्णी यांच्या प्रवचनाचे आयोजन केले होते. सायं. ६.५९ मि. भगवान श्री परशुराम जन्मकाळ सोहळा संपन्न झाला. संघाचे अध्यक्ष श्री नंदकुमार मराठे यांच्या हस्ते आरती करण्यात आली. या नंतर भगवान श्री परशुराम प्रतिमा पालखीत बसवण्यात आली. यावेळी करवीर नगरीचे छत्रपती श्रीमंत मालोजीराजे यांचे सुपुत्र मा. श्री यांच्या हस्ते पालखी पुजन करण्यात आले. मा. श्री यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यानंतर ढोल, ताशा, वाजंत्री यांच्यासह ट्रॅक्टर ट्रॉली अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली. लोकराजा छत्रपती श्रीमंत शाहू महाराज यांच्या कृतज्ञता पर्वाच्या निमित्ताने त्यांना अभिवादन करण्यात आले. श्री बसवेश्वर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्याही फोटोंना मिरवणूकीत मानाचे स्थान देण्यात आले. कोल्हापूर चित्पावन संघ, गुरुमहाराज वाडा, मंगळवार पेठ येथून भगवान श्री परशुराम पालखी मिरवणुक बिनखांबी गणेश मंदीर, महाद्वार रोड, जोतिबा रोड, श्री महालक्ष्मी मंदीर दशावतार व श्री महालक्ष्मीच्या दर्शनाने मिरवणुकीची सांगता करण्यात आली. यानंतर उपस्थित श्री परशुराम भक्तांना संघातर्फे अल्पोपहार व पन्हे देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

या सोहळ्यात कोल्हापूरातील अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ, ब्राह्मण सभा करवीर मंगलधाम, कऱ्हाडे ब्राह्मण संघ, दक्षिण काशी पुरोहित मंडळ, राघवेंद्र स्वामी मठ, करवीर निवासिनी पुरोहित मंडळ, शुक्ल यजुर्वेदी मंडळ, सारस्वत विकास मंडळ, कोल्हापूर जिल्हा पुरोहित मंडळ, श्री परशुराम पत संस्था व इतर सर्व संस्था व संस्थांचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.


या सोहळ्यात संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार मराठे, उपाध्यक्ष प्रसाद भिडे, कार्यवाह केदार जोशी, खजानीस सौ. संगीता आपटे, संचालक श्री मकरंद करंदीकर, श्री महेश खाडीलकर, श्री. विठ्ठल नरवणे, सौ. सीमा गोखले, श्री परशुराम संस्थेचे अध्यक्ष श्री मुकुंद गोरे, संचालक श्री माधव करंदीकर, श्री गिरीष जोग, अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. विवेक जोशी उपाध्यक्ष श्री. शामराव जोशी, ब्राह्मण सभेचे कार्यवाह श्रीकांत लिमये, श्री महालक्ष्मी बँकेचे उपाध्यक्ष सीए महेश धर्माधिकारी, कऱ्हाडे ब्राह्मण संघाचे श्री मिलिंद पावनगडकर तसेच अनेक कार्यकर्ते व श्री परशुराम भक्त उपस्थित होते.

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :** info@shogini.com

**Visit us at :** www.shogini.com


**PRINTED BOOK**

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.